शुक्रवार, २० जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१५१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी


● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 20 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-151 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## चर्चेतली बातमी

## अभिनेत्री राखी सावंतला अटक!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेत्री राखी सावंतला मुंबईतील आंबोली



पोलिसांनी अटक केली आहे. एका मॉडेलचा फोटो व्हायरल केल्याचा आरोप राखी सावंतवर करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तक्रारीची दखल घेत त्यावरून पोलिसांनी कारवाई केली आहे. या महिलेचा फोटो राखीने व्हायरल केला होता. यासंदर्भात संबंधित मॉडेलने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. अभिनेत्री शरलीन चोप्रानं यासंदर्भात ट्विटरवर माहिती दिली आहे. 'आंबोली पोलिसांनी राखी सावंतला ८३३/२०२२ क्रमांकाच्या एफआयआरप्रकरणी अटक केली आहे. काल राखी सावंतने यासंदर्बात अटकपूर्व जामिनासाठी मुंबई सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला', अशी माहिती शरलीन चोप्राने ट्वीटमध्ये दिली आहे. दरम्यान, राखी सावंतला थोड्या वेळात न्यायालयात हजर केले जाणार असून त्यानंतर तिला पोलीस कोठडी की न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात येईल, याबाबत चित्र स्पष्ट होईल. दरम्यान, राखीविरोधात शरलीन चोप्रानंच तक्रार दाखल केल्याचे सांगितले जात आहे. शरलीन चोप्राचा एक आक्षेपार्ह व्हिडीओ राखीनं पत्रकार परिषदेत दाखवला होता आणि त्यावरून आक्षेपार्ह भाषेत विधानही केले होते म्हणून राखीविरोधात तक्रार दाखल करण्यात आल्याचेही सांगितले जात आहे.

# डबल इंजिन सरकारमुळे कामाला गती

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : मुंबईत विविध प्रकल्पांचे भूमिपूजन



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मधल्या काळात डबल इंजिन सरकार नव्हते त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्राचे नुकसान झाले. कारण त्या सरकारच्या काळात विविध योजना आणि प्रकल्प यांच्यात अडथळे निर्माण करण्याचे काम झाले. आता मात्र विकासाला पुन्हा गती आली आहे. कारण शिंदे फडणवीसांचे डबल इंजिन सरकार महाराष्ट्राल मिळाले आहे, आता हा विकासाला गती मिळाली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.**

मुंबईकरांच्या प्रत्येक समस्येला मी समजू शकतो. भाजपाचे सरकार असो किंवा एनडीएचे सरकार असो आम्ही विकासाच्या पुढे राजकार कधीही आणत नाही. राजकीय स्वार्थासाठी विकासात अडथळे आणत नाही असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे भूमिपूजन आणि करण्यात आले. त्या कार्यक्रमात विविध मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात विविध मुद्द्यांवर भाष्य केले. स्वराज्य आणि सुराज्य हा छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार आहे तोच विचार आम्हीही पुढे घेऊन चाललो आहोत.
या देशाचा आणि महाराष्ट्राचा विकास आम्ही करतो आहोत. मुंबईच्या विकासाशी संबंधित ४० हजार कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि शिलान्यास करण्यात आला आहे. मुंबईकरांसाठी अत्यावश्यक असलेली मेट्रो असो किंवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसाचे नुतनीकरण असो, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना असो या सगळ्या योजना मुंबईच्या विकासात भर घालणाऱ्या आहेत. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदाच भारत देश मोठी स्वप्ने पाहू शकतो आहे ती स्वप्ने पूर्ण करण्याचे साहस करू शकतो. आपला एक मोठा कालखंड गरिबीची चर्चा करण्यात आणि जगातल्या देशांकडून मदत मागण्यात गेला. मात्र आता जगाला भारताच्या विविध संकल्पांवर विश्वास बसू लागला आहे. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाल्यानंतर आधुनिक भारत ही संकल्पना पुढे आली आहे. भारताबाबत जगभरात सकारात्मकता आहे. कारण सगळ्या जगाला हे समजले आहे की, भारत देश आपल्याकडे असलेल्या सामर्थ्याचा सदुपयोग करतो आहे असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.
भारत देश आज ते करतो आहे जे विकासाच्या गतीसाठी आणि समृद्धीसाठी आवश्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आमच्या समोर आहे. स्वराज्य आणि सुराज्य ही भावना इथल्या सरकारमध्ये प्रबळ आहे. आपण तो काळही पाहिला आहे की गरीबाच्या हिताचे पैसे घोटाळ्यात खाल्ले जायचे. करदात्यांकडून घेतलेला कर घेऊन असंवेदनशीलता केली गेली. त्याचा फटका कोट्यवधी भारतीयांना बसला. आम्ही मागच्या आठ वर्षात ही मानसिकता बदलली आहे असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. मुंबईला भविष्यातल्या विकासासाठी तयार करणे ही डबल इंजिन सरकारची जबाबदारी आहे.

# पुणे साखळी बॉम्बस्फोट; आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज


**'या' पाच ठिकाणी ठेवण्यात आले होते बॉम्ब :** डेक्कन परिसरातील पाच ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पहिला बॉम्ब बालगंधर्व रंगमंदिराजवळ ठेवण्यात आला होता. त्यानंतर मॅकडोनाल्ड कॅफे, देना बँक, गरवारे पूल या ठिकाणीदेखील बॉम्ब ठेवण्यात आले होते. मात्र बॉम्ब बनवण्यात त्रुटी राहिल्याने पुण्यात मोठी जीवितहानी टळली होती.



**पुणे :** 2012 मधील पुण्यातील जंगली महाराज रोड परिसरातील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर केला आहे. आरोपी असलम शब्बीर शेख उर्फ बंटी जहागीरदारला हायकोर्टाने जामीन मंजूर केला आहे. 2013 मध्ये जहागीरदारला अटक करण्यात आली होती. 1 ऑक्टोबर 2015 रोजी त्यांना हायकोर्टाने त्याला पहिल्यांदा जामीन मंजूर केला होता. मात्र 2019 मध्ये जामिनातील अटींचे उल्लंघन केल्याबद्दल एटीएसच्या विनंतीवरुन जहागीरदारचा जामीन हायकोर्टाने रद्द केला होता. त्यानंतर जहागीरदारने साल 2020 मध्ये पुन्हा जामीनासाठी अर्ज केला होता. त्यानुसार त्याला आता जामीन मंजूर झाला आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने या बॉम्बस्फोट प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक केली आहे. मुनीब इक्बाल मेमन, असद खान, इम्रान खान, सय्यद फिरोज, इरफान मुस्तफा लांडगे, फारुख बागवान, काशिफ बियाबानी आणि असलम शब्बीर शेख उर्फ बंटी जहागीरदार, अशी त्यांची नावे होती. भारतीय दंड संहिता बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्या, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, स्फोटक पदार्थ कायदा आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. 1 ऑगस्ट 2012 रोजी पुण्यातील जंगली महाराज रोडवर पाच साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या स्फोटामध्ये एक जण जखमी झाला होता. डेक्कन परिसरातील सहा ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पाच बॉम्ब काही मिनिटांच्या अंतराने फुटले होते तर एक बॉम्ब फुटला नाही. दहशतवाद्यांकडून हे बॉम्ब तयार करण्यात त्रुटी रहिल्याने मोठी दुर्घटना टळली होती. मात्र डेक्कन परिसरात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली होती. अनेकांना सुरुवातीला या स्फोटांचे गांभीर्य लक्षात आले नाही मात्र काही मिनिटांतच काही अंतरावर ठेवण्यात आलेले पाच बॉम्ब सलग फुटल्याने मोठा हल्ला असल्याचे समोर आले होते. त्यानंतर पुण्यातील संपूर्ण यंत्रणा कामाला लागली होती.

# ट्रक चालकांसाठी सरकार कायदा आणणार : नितीन गडकरी

आधुनिक केसरी न्यूज





**नवी दिल्ली :** ट्रक चालकांसाठी सरकार लवकरच कायदा आणणार असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्लीतील एका कार्यक्रमा दरम्यान बोलताना सांगितलं. तसचे, रस्ते अपघात 2025 च्या अखेरपर्यंत 50 टक्क्यांनी कमी करण्याचे मंत्रालयाचे उद्दिष्ट असून त्यासाठी प्रयत्नही सुरू असल्याचे गडकरींनी सांगितले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, लवकरच ट्रक चालकांच्या कामाचे तास निश्चित करण्यासाठी कायदा आणला जाईल. तसेच, 2025 च्या अखेरपर्यंत रस्ते अपघात 50 टक्क्यांनी कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचंही यावेळी नितीन गडकरींनी सांगितले. रस्ता सुरक्षा सप्ताहादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक मोहिमेमध्ये नितीन गडकरी सहभागी झाले होते. यावेळी ते म्हणाले की, रस्ते मंत्रालय, रस्ते अपघात कमी करण्यासाठी मंत्रालय कटिबद्ध आहे आणि रस्ते सुरक्षेत कोणतेही 4ई - अभियांत्रिकी, अंमलबजावणी, शिक्षण आणि आपत्कालीन काळजी या क्षेत्रात अनेक पावले उचलली गेली आहेत. बुधवारी प्रसिद्ध झालेल्या सरकारी निवेदनानुसार, मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, ट्रक चालकांसाठी कामाचे तास निश्चित करण्यासाठी कायदा आणला जाईल. या वर्षी मंत्रालयाने 'सर्वांसाठी सुरक्षित रस्ते' या उपक्रमाचा प्रचार करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छता पंधरवड्यातंर्गत 11 ते 17 जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा केला.

# आधुनिक केसरीचा दणका; बातमी येताच वन विभागाला जाग

## 22 हेक्टर क्षेत्रावर समाजकंटकांकडून झाडांची कत्तल करून जमीन बळकावण्याचा प्रयत्न


आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

**उस्मानाबाद :** जिल्ह्यातील वाशी तालुक्यामधील तेरखेडा शिवारातील तब्बल 22 हेक्टर क्षेत्रावर अज्ञात समाजकंटकाकडून लाखो झाडांची कत्तल करून वन विभागाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला होता. संपूर्ण वृक्ष बुडासकट तोडून संबंधित वन विभागाचे क्षेत्र ताब्यात घेऊन जागोजागी तंबू ठोकण्यात आले होते मात्र दैनिक आधुनिक केसरी मध्ये हे वृत्त येताच,वन विभाग खडबडून जागे होत, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 31जेसीबी व शेकडोच्या वर पोलीस बंदोबस्त सोबत घेऊन अज्ञात समाजाकडून अतिक्रमण केलेली जमीन वन विभागाने ताब्यात घेतली.

बेकायदेशीर वृक्षतोड करून वन विभागाच्या जागेत अतिक्रमण करण्यात आले तर कडक कार्यवाई करण्यात येईल.
किशोर पोळ,जिल्हा वन विभागीय अधिकारी, उस्मानाबाद






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल



आधुनिक केसरी

पण हे सगळे केव्हा प्रत्यक्षात येईल ? जेव्हा आपण आपल्या भाषेला उत्तम देहबोलीची जोड देऊ शकू तेव्हा ! यासाठी देहबोलीतील काही ठळक महत्वाच्या गोष्टी आपण पाहू. विविध प्रसंगी आपली देहबोली काय सांगते ते पहा. मान हलविणे ही कृती ती व्यक्ती जास्त पुढे पुढे करण्याचा प्रयत्न करते आहे हे दर्शविते. हस्तांदोलन करताना हलकेच हात मिळवणे ही गोष्ट आत्मविश्वासाचा अभावदर्शक आहे. बसताना खिशात हात घालून बसणे ही गोष्ट उदासीनता दर्शविते. मात्र उभे असताना खिशात हात घालून उभे राहणे त्या व्यक्तीच्या मनातील संशय दर्शवते. नजर किंवा डोळे खाली झुकवून बसणे, मान वेगळ्या दिशेला वळवणे या गोष्टी समोरच्या व्यक्तीला तुमच्या बोलण्यात रस नाही हे दाखवतात. सारखे मान किंवा डोके खाजवणे, कानाच्या पाळीला हात लावणे किंवा खाजवणे या गोष्टी त्या व्यक्तीचा अविश्वास दर्शवतात. समोरची व्यक्ती सारखी आपल्या पापण्यांची उघडझाप करीत असेल तर ती खोटे बोलते आहे असा संकेत त्यावरून मिळतो. गालांवर हात ठेवणे हे चिंता दर्शविते. बळजबरी हसणे हे नाराजी निदर्शक आहे. बसल्या बसल्या ओठ चावणे हे चिंतेचे निदर्शक आहे. नखे कुरतडणे निराशा दर्शक आहे. तर बोलताना सारखे नाकाला हात लावणे किंवा स्पर्श करणे हे खोटे बोलण्याचे निदर्शक असू शकते. खांदे झुकवून चालणे किंवा बसणे हे असुरक्षितता किंवा आत्मविश्वासाची कमी दर्शवते. बसल्या बसल्या सारखे हात पाय हलविणे हे अस्वस्थता निदर्शक आहे. हाताची घडी घालून बसलेली किंवा उभी असलेली व्यक्ती ही सुरक्षित आणि वेगळे राहण्याचा प्रयत्न करते हे दर्शविते. आपण ज्या वातावरणात वाढतो त्या वातावरणाचा प्रभाव आपल्या देहबोलीवर पडत असतो. उदाहरणार्थ, एखादे मूल लहानपणापासून मुलींच्या किंवा स्त्रियांच्या सहवासात वाढले असेल तर साहजिकच त्याच्या देहबोलीवर मुलींचा किंवा स्त्रियांच्या वागण्याचा परिणाम होऊन त्याची देहबोली तशी होऊ शकते. उलटपक्षी एखादी मुलगी सतत मुलांमध्ये खेळत असेल तर तिच्या वागण्यात काहीसा पुरुषीपणा येण्याची शक्यता असते.

**क्रमशः**



# आनंदी पहाट

## व्यक्तिमत्वाचा विकास मानसिक स्वास्थ्यावर ठरतो

आधुनिक केसरी

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धापर्णापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचं असतं. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचार जरी ते सामान्य आहेत असं वाटत असलं तरीही सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच परिवर्तन घडवून आणू शकतो. आपल्या व्यक्त होण्यातून आपलं व्यक्तिमत्वाचं वेगळेपण त्यांतच सामावलेलं असतं. प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक गुण असतात; त्यातील काही गुण इतरांसारखे देखील असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे, निराळे असतात. खरं तर ह्या वेगळ्या गुणांमुळेच ती व्यक्ती ओळखता येते. म्हणूनच, व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीमधील वैविध्यपूर्ण गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्णसंच होय. व्यक्तिमत्व विकास हि एक व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये, शारीरिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, आत्मिक विकास अशा अनेक बाबींचा समावेश असल्याचं दिसून येत असतं. सध्याच्या २१ व्या शतकात व्यावसायिक क्षेत्रात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फक्त उच्च शिक्षण असून चालत नाही; त्यासोबत आपल्यातील आत्मविश्वास सुद्धा महत्वाचा ठरत असतो. आपल्या व्यक्तिमत्वाचा किती प्रभाव पडतो, ह्यावर आपल्या कामाचा आलेख ठरविला जात असतो. आपण कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात काम करत असताना आपल्या वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव पडत असतो. आपण आपले विचार, विषय किती तार्किक पद्धतीने, अगदी सोप्या भाषेत, सोयीस्कररित्या, न अडखळता, धीटपणाने आणि समोरच्या व्यक्तीला पटतील असे मांडू शकल्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव निश्चितच समोरच्या व्यक्तीवर पडतो. समोरची व्यक्ती बोलत असताना तेवढ्याच शांततेनं, त्या व्यक्तीला ऐकून घेण्याची क्षमता सुद्धा आपल्यात असल्यास, आपल्या व्यक्तित्वाला एक आकार, एक वेगळं महत्व मिळू शकतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**अभंग भिजावा | इंद्रायणी ||**

**मन रममाण | व्हावे ऐसे स्थान ||**
**ज्ञानाचे निधान | लाभो मज ||१||**
**नको वाचाळांची | गर्दी भोवताली ||**
**जन्माची त्रासली | जीवदशा ||२||**
**आशेच्या वृक्षाला | लागावी वाळवी ||**
**शांतीने चाळावी | मन पर्णे ||३||**
**अनाथांचे दुःख | सनाथ जाणेना ||**
**सुटे कैसा पान्हा | मायेविन ||४||**
**सोन्याचा पिंपळ | अंतरी फुलावा ||**
**अभंग भिजावा | इंद्रायणी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**आपले संशोध्य आपल्याला मिळावे, या सारखे दुसरे सुख अजून अस्तित्वात यावयाचे आहे.**

.....................................................................

**निर्भिडता म्हणजे अहंकार नाही. भित्रेपणा म्हणजे विनम्रता नाही. अहंकार हे विनाशाचे, निर्भिडता हे सौजन्याचे, विनम्रता हे सर्जनाचे आणि भित्रेपणा हे पराभवाचे मुक्तद्वार आहे.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**हे प्रभु महिमा आपकी, अगम अनन्त अपार । नेति नेति अज श्रुति कहै, जन अधीन किमि पार ।।२८।। (स्वर्वेद प्रथम मण्डल द्वितीय अध्याय) ०१/०२/२८ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** हे प्रभो ! आपली महिमा अगम, अनंत, अपार आहे ज्यास चारही वेद सदैव नेति नेति म्हणतात अर्थात ज्याची इति म्हणजेच सीमा नाही, अनंत आहे. मी अल्पज्ञ जीव आपल्या या अनंत महिमेचे वर्णन करण्यासाठी कसा समर्थ होऊ शकेन ?

..........................................................................

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

रामानुजाचार्यांनी मुक्त आणि नित्यमुक्त असे दोन मुक्य मानले आहेत. ते कसे जे भगवंताला शरण जाऊन त्याच्या आशिर्वादाला प्राप्त होणारे त्याची क्रुपा भोगणारे ते मुक्त व जे अखंड भगवंतापाशीच रहातात संसारात कधीच येत नाहीत ते नित्यमुक्त समजावे.

मित्रांनो आपण आता समर्थांनी सांगितलेल्या मुक्त ,जीवमुक्त, विदेहमुक्त आणि नित्यमुक्त अशा चार प्रकारांचा अभ्यास आता करुया.

जे मुक्त असून जीवंत असतात ते जीवमुक्त समजावे. मुक्त होऊन ज्यांनी देह ठेवला ते विदेहमुक्त समजावे.

या दोन्हीही पेक्षा निराळे असतात आणि ते नित्यमुक्त असतात त्यांना योगेश्वर समजावे. या विश्वामध्ये अध्यात्मिक विचार टिकवून धरण्याचे कार्य मुक्त पुरूष करतात. काही काळ असा येतो की त्यावेळी लोकांना अध्यात्माकडे वळवण्यात येण्यासाठी विलक्षण सामर्थ्य हवे असते त्यावेळी नित्यमुक्त जन्म घेतात. त्यांना अवतारी संत म्हणतात. त्यांना ब्रम्हज्ञाना बरोबर योगाचेही सामर्थ्य असते त्यांनाच "योगेश्वर"असे म्हणतात. शेगावच्या श्री गजानन महाराजांनी या योग सामर्थ्य ने पाटलांच्या मुलांना चरका वाचून ऊसाचा रस काढला व या पोरांना दिला. त्यालाच योगसामर्थ्य असे म्हणतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नाम व प्रारब्धभोग

आधुनिक केसरी

नामाचा संबंध प्रारब्धाशी कसा आहे, असे पुष्कळ लोक विचारतात. हा प्रश्न एका दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. बहुतेक लोक प्रारब्ध टळावे म्हणून नाम घेतात. देहाचे सुखदुःख हे माझेच सुखदुःख आहे, किंबहुना, देह सुखी तर मी सुखी, आणि देह दुःखी तर मी दुःखी, अशी सामान्य मनुष्याची अवस्था असते. बरे, प्रारब्धाचे भोग हे आजपर्यंत कोणालाही चुकले नाहीत. मग कसे करावे ? इथे असे लक्षात ठेवावे की, प्रारब्धाची गती फक्त देहापुरतीच असते; म्हणून, ज्याची देहबुद्धी कमी झाली तो देहाच्या सुखदुःखाने सुखी वा दुःखी होत नाही. नामाने देहबुद्धी कमी होते. म्हणून, नामात राहणारा मनुष्य प्रारब्धाचे भोग भोगीत असताना देखील आनंदात असतो. नामाच्या आनंदापुढे त्याला प्रारब्धाची किंमत राहात नाही. नामाचे सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी घडलेले अपराध नाम नाहीसे करते. वाया गेलेल्या माणसांना नाम तारते. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा, पूजेचा राजा आहे. आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य नामाने लाभते, आणि त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते. सर्व काळी, सर्व ठिकाणी, सर्व अवस्थांमध्ये कोणालाही करता येण्यासारखे नाम हेच एक साधन आहे. नामाला उपाधी अत्यंत कमी असल्याने निरुपाधिक



भगवंताशी नाते जोडायला नामासारखे साधन नाही. खरोखर, किती प्रकारांनी तुम्हांला मी सांगू ! अखंड नामात राहणे यालाच मोक्ष म्हणतात. अखंड नामात जगणे यालाच पराभक्ती म्हणतात. जो नामात अखंड गुंतला त्यालाच संत म्हणतात. नामात प्रेम येणे ही संतांची खरी खूणच आहे. तेव्हा माझे एवढे ऐका : नामाला कदापिही विसरू नका. प्रारब्धाच्या भोगांना न कंटाळता, भगवंताने ज्या स्थितीत आपल्याला ठेवले असेल त्यामध्ये समाधान माना, पण केव्हाही त्याच्या नामाला विसरू नका. नामाने पापी माणसे पुण्यवान् बनतात. देहबुद्धी कमी होणे हेच पुण्य होय, आणि ते नामाने प्राप्त होते. नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. वाईट किंवा विषयाच्या वासनेने बुद्धी भ्रष्ट करणे हेच कलीचे मुख्य लक्षण होय. त्याच्या मुळावर घाव घालण्याचे काम नाम घेतल्याने होते, म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही आणि प्रारब्धाची क्षिती नाही. नामाने पुण्यशरीर बनते. ज्याच्या अंतरात नाम असते तिथे भगवंताला यावे लागल्याने, त्याच्या शरीरात सत्त्वगुणाची वाढ होते आणि तो पुण्यवान् बनतो. देह प्रारब्धावर टाकून, आणि आपण त्याहून निराळे राहून, जे होईल त्यात आनंद मानावा. भोग प्रारब्धाने येतात असे म्हणण्यापेक्षा ते भगवंताच्या इच्छेने येतात असे म्हटले की समाधान मिळेल. **आजचे बोधवचन आहे- १९. भगवंताला स्मरून काम करीत असताना. जे योग्य दिसेल ते त्याच्या इच्छेनेच आहे असे समजून काम करावे. जो असे करील त्याला समाधान झालेच पाहिजे.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ॥२॥
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥३॥
सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥१॥
तुळसीचे हार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥२॥
तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३॥

आधुनिक केसरी
शुक्रवार, २० जानेवारी २०२३



भारत-पाकिस्तान फाळणीचे तीव्र विरोधक !
पान 5

# भोकरची शासकीय कार्यालये लाच लुचपतच्या कचाट्यात

## वजन ठेवल्याशिवाय फाईल पुढे सरकतच नाहीत

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर : शहरातील महत्त्वाच्या शासकीय कार्यालयात मागील अनेक वर्षापासून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे धाडसत्र सूरू आहे. नागरीकांना शासकीय कामे पदरात पाडून घेण्यासाठी लाच द्यावी लागते हे यावरून सिद्ध झाले आहे. संबधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा" लगाम" सैल होत गेल्याने अशा प्रकारात दिवसेनदिवस वाढ होत आहे.**

होणाऱ्या गैरप्रकारांना त्वरीत आळा बसने गरजेचे आहे. शहरात मागील अनेक वर्षांपासून शासकीय कार्यालय आहेत. यात प्रामुख्याने तहसील कार्यालय, पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, वनपरिक्षेत्र कार्यालय, पोलीस स्टेशन, गटशिक्षण अधिकारी कार्यालय, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, महत्त्वाचे कार्यालय कार्यरत असून मागील तीन वर्षाच्या कालावधीत पंचायत समिती, तहसील कार्यालय, वनपरिक्षेत्र कार्यालय, पोलीस स्टेशन या कार्यालयातील कर्मचारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले होते. महिना दोन महिन्याला तालुक्यात कर्मचारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात फसतात. महत्त्वाच्या कार्यालयात सर्वसामान्य जनतेकडून पैशाची मागणी केली जाते हे उघड झाले आहे. तहसील कार्यालय आणि पंचायत समिती कार्यालयात सात ते आठ टेबलवर वजन ठेवल्याशिवाय फाईल पुढे सरकतच नाहीत अशा असंख्य तक्रारी आहेत.

**अधिकाऱ्याचा लगाम झाला सैल :** तालुक्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी यांना तहसील कार्यालयात कामासाठी विविध कागदपत्रासाठी यावे लागते, शेतीशी निगडित कामे, फेरफार नक्कल, सातबारा, शेती नावाने करणे, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, गौण खनिजाचा प्रकार मुरूमाचे उत्खनन, रेतीची होणारी चोरटी वाहतूक अशा सर्व बाबींवर कडक नियंत्रण ठेवून कार्यवाही करण्याची गरज आहे. भोकर पंचायत समिती कार्यालयातील कामाबाबत अनेक गावांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत विविध विकास कामांचा आलेला निधी,



त्याची झालेली कामे, प्रत्यक्ष कामाचा प्रकार, नागरिकांच्या तक्रारीनंतर चौकशी का झाली नाही, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले, असे विविध प्रश्न असून पंचायत समिती कार्यालयातील टेबल वर वजन ठेवल्याशिवाय कुठलीही फाईल पुढे सरकत नाहीत अशा तक्रारी आहेत. यावर नियंत्रण ठेवून स्वच्छ कारभार ठेवणे गरजेचे आहे.

# दिल्लीत महिला आयोगाच्या अध्यक्षाच असुरक्षित

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वाती मालीवाल यांना गुरुवारी पहाटे रस्त्यात एका मद्यधुंद गाडी चालकाने छेडछाड केल्याचा आणि ओढत नेल्याची घटना घडली आहे. स्वतः स्वाती मालिवाल यांनी ही माहिती दिली आहे. स्वाती मालीवाल यांनी एक ट्वीट करत ही माहिती दिली आहे. त्या म्हणाल्या की, दिल्लीतील महिलांच्या सुरक्षेची स्थिती काय आहे हे पाहण्यासाठी मी गेल्यानंतर एका मद्यधुंद गाडी चालकाने माझ्याशी छेडछाड केली. मी त्याला पकडले त्यावेळी त्याने गाडीच्या खिडकीमध्ये हात अडकवला आणि मला ओढत नेलं. महिलांच्या सुरक्षेची स्थिती तपासण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या असताना मालीवाल यांना स्वतःलाच छेडछाडीच्या घटनेला सामोरे जावे लागल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. स्वाती मालीवाल गुरुवारी पहाटे 3.11 च्या सुमारास एम्स जवळील फुटपाथवर असताना हरीश चंद्रा हा माणूस बलेनो कारमध्ये चढला आणि त्याने मालीवाल यांच्याशी छेडछाड केली. तो खूप मद्यधुंद अवस्थेत होता. त्यावेळी महिला आयोगाची टीम त्या ठिकाणापासून काही अंतरावर होती. दिल्लीतील घडलेल्या या गंभीर घटनेप्रकरणी 47 वर्षीय हरीश चंद्रा या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. स्वाती मालीवाल यांनी त्या व्यक्तीसोबत जाण्यास नकार दिल्यानंतर त्याने गाडी पुढे नेली, पण नंतर त्याने पुन्हा यू टर्न घेतला आणि स्वाती मालीवाल यांना जबरदस्तीने कारमध्ये खेचण्याचा प्रयत्न केला. जेव्हा मालीवाल यांनी त्या व्यक्तीला पकडण्याचा प्रयत्न केला.





# गौण खनिजाची अवैध वाहतूक; तीन वाहनांवर महसूलची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील वासडी येथे अवैध गौण खनिज भरारी पथक यांनी जनार्दन विधाते उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार संजय वारकड तहसीलदार कन्नड यांच्या भरारी पथकानी अवैध मुरूम वाहतूक करणारे हैवा, एक ट्रॅक्टर व अवैध माती वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर असे एकूण 3 वाहने पकडून तहसील कार्यालय येथे लावण्यात आले आहेत पुढील दंडात्मक कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदरील हायवा व ट्रॅक्टर वासडी येथे अवैध मुरूम वाहतूक करताना पथकांनी जप्त केले आहे. तसेच एक ट्रॅक्टर कन्नड येथे अवैध माती वाहतूक करत असताना पथकाने जप्त केले आहे. या मोहिमेमध्ये तलाठी तसेच कोतवाल यांची उपस्थीती होती.

# विजेच्या धक्क्याने बालकाचा मृत्यू

## पीडित परिवाराला भरपाई द्यावी : आ. फारुख शाह यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील महावितरण च्या बेजबाबदार पणामुळे गफुर नगर येथे एका निष्पाप बालकाचा बळी गेला आहे .या दुर्घटनेची तत्काळ चौकशी होऊन बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई व्हावी व निष्पाप बळी गेलेल्या बालकाच्या परिवाराला शासनाकडून तत्काळ मदत मिळावी अशी मागणी आमदार फारुख शाह यांनी अधिक्षक अभियंता यांच्याकडे केलेली आहे. काल दि.१८/०१/२०२३ रोजी सायंकाळी ८ ते ९ च्या दरम्यान वडजाई रोड गफुर नगर भागात अरशद अशपाक अहमद हा बालक खेळत असतांना त्याला पोलवरून विजेचा झटका लागल्याने तो जागीच मृत्यू पावला होता. यावेळेस या भागातील नागरिकांनी वडजाई रोड महावितरणच्या कार्यालयात अनेक फोन केले.परंतु कोणीच फोन उचलला नाही संबंधित अधिकारी व कर्मचारी वडजाई रोड महावितरणच्या कार्यालयात उपस्थित राहत नाही. तसेच शहरातील अनेक भागात पोल,डीपी व लोंबकळणा-या वायरी संदर्भात आमदार कार्यालयाकडून अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु यांचे गांभीर्य महावितरण अधिकाऱ्यांना नाही त्याचीच परणीती म्हणून काल एका निष्पाप बालकाचा बळी गेला. यापुर्वी सुद्धा महावितरण कंपनीच्या बेजवाबदारपणामुळे शहरातील नागरिकांचे बळी गेलेले आहेत. तरी अशा बेजवाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तत्काळ निलंबनाची कारवाई व्हावी व बालकाच्या परिवाराला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी आ. फारुख शाह यांनी केली आहे. आज या दुर्घटनेच्या ठिकाणी महावितरण व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत जावून आमदार फारुख शाह यांनी पिडीत परिवाराला सांत्वन केले व आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळेस महावितरणचे कार्यकारी अभियंता पाटील, वडजाई रोड येथील उपअभियंता चव्हाण, साळुंके, बागुल, नगरसेवक मुख्तार बिल्डर, डॉ.सरफराज अन्सारी व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# नाशिकमध्ये शुभांगी पाटील व नागपुरात सुधाकर अडबालेंना मविआचा पाठिंबा : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विधान परिषदेच्या पाच जागांसाठी महाविकास आघाडी एकत्रितपणे लढणार आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघात शिवसेनेच्या उमेदवार शुभांगी पाटील व नागपूर शिक्षक मतदारसंघातून सुधाकर अडबाले यांना महाविकास आघाडीचा पाठिंबा आहे. नाशिक मतदारसंघातील घटनांमुळे डॉ. सुधीर तांबे यांना पक्षाने आधीच निलंबित केले असून सत्यजित तांबेवरही कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीवरून महाविकास आघाडीत समन्वय असून शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्रीत चर्चा करून नाशिक व नागपूर मतदार संघाबाबत निर्णय घेतलेला आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघात डॉ. सुधीर तांबे यांना काँग्रेसची उमेदवारी दिली असतानाही त्यांनी पक्षाशी बेईमानी करत अर्ज दाखल केला नाही त्यामुळे बदललेल्या राजकीय परिस्थितीत नाशिकमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराला व नागपूरमध्ये काँग्रेस पुरस्कृत उमेदवार सुधाकर अडबाले यांना मविआचा पाठिंबा आहे. विधान परिषद निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नागपूरमधून सुधाकर अडबाले, अमरावतीमधून धीरज लींगाडे, औरंगाबादमधून विक्रम काळे, नाशिकमधून शुभांगी पाटील व कोकणमधून बाळाराम पाटील असतील. विधान परिषदेच्या या पाचही जागांवर महाविकास आघाडीतील पक्ष कार्यकर्ते एकदिलाने काम करून या पाचही जागा विजयी करतील. जुनी पेन्शन योजना लागू करण्यास काँग्रेस पक्षाचा पाठिंबाच आहे म्हणून तर काँग्रेसशासित राजस्थान, छत्तिसगड व हिमाचल प्रदेशात जुनी पेन्शन योजना लागू केली आहे परंतु भाजपाशिसत राज्यात ही योजना लागू केली जात नाही. सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये या मुद्द्यांवरून भाजपाविरोधात तीव्र संताप आहे. महागाई, बेरोजगारी हे मुद्देही महत्वाचे आहेत. नाशिकमध्ये भारतीय जनता पक्षाला उमेदवारही मिळाला नाही. भाजपा हा दुसऱ्यांची घरे फोडणारा पक्ष असून पाठीमागून वार करणाऱ्या भाजपाला जनताच धडा शिकवेल. या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना नेते व विधान परिषदचे विरोधी पक्षनेते आंबादास दानवे, राष्ट्रवादीचे नेते व माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे व माजी आमदार उल्हास पवार आदी उपस्थित होते.



# महिला अधिकाऱ्याचे प्रताप

आधुनिक केसरी

एका औषध कंपनीकडे दोन कोटींची लाच मागितल्याप्रकरणी राजस्थानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अजमेरच्या अतिरिक्त पोलिस अधिक्षक दिव्या मित्तल यांना दोन दिवसांपूर्वी अटक केली होती. दिव्या मित्तल यांच्या चौकशीतून अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. दिव्या यांच्या अटकेनंतर पोलिसांनी उदयपूर येथील त्यांच्या फार्म हाऊस आणि रिसॉर्टवर छापा टाकला. या छाप्यात महागडे विदेशी मद्य जप्त करण्यात आले आहे. हे मद्य 'खास' पाहुण्यांना दिले जात असल्याची माहिती समोर आली आहे. हे रिसॉर्ट दिव्या मित्तल यांचा सहकारी आणि निलंबित पोलिस कर्मचारी सुमित कुमार चालवत होता. सुमित कुमार देखील लाच घेतल्याप्रकरणी निलंबित आहे. आता दोघांविरोधात पोलिसांनी अबकारी अधिनियमांच्या कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या रिसॉर्टवर मद्य सुविधा देण्याचा कोणताही परवाना दिलेला नव्हता. तरिही बेकायदेशीररित्या इथे मद्य पुरविले जात होते. राजस्थानमधील माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार या रिसॉर्टवर अनेक राजकारणी आणि काही खास पाहुणे येत होते. अटक झाल्यानंतर दिव्या मित्तल यांनी सांगितले होते की, वरपर्यंत पैसे पोहोचते करावे लागतात. आता वरपर्यंत म्हणजे नेमके कुठे? यात काही राजकीय पुढाऱ्यांचा देखील समावेश आहे का? अशीही अटकळ बांधण्यात येत आहे. याच रिसॉर्टवर औषध कंपनीच्या एका प्रतिनिधीला बोलावून धमकी देण्यात आली होती. दिव्या मित्तल यांच्यासाठी सुमित कुमारने संबंधित कंपनीकडे दोन कोटींची मागणी केली होती. तसेच २५ लाख रुपयांचा पहिला हप्ता अजमेर येथे देण्याचेही ठरले होते.
मात्र औषध कंपनीच्या प्रतिनिधींने एसीबीकडे याची तक्रार केल्यानंतर दिव्या मित्तल यांचा लाचखोरीचा प्रकार समोर आला. राजस्थान एसीबीकडून दिव्या मित्तल यांची कसून चौकशी सुरु आहे. एसीबीने अजमेर, उदयपूर, झुंझुनू आणि जयपूर येथील पाच ठिकाणांवर पोलिसांनी छापेमारी केली असून आणखी मालमत्तेची चौकशी करण्यात येत आहे. दिव्या मित्तल या अजमेर येथे स्पेशल ऑपरेशन ग्रुपच्या अतिरिक्त पोलिस अधिक्षक या पदावर कार्यरत होत्या. त्या मूळ हरियाणा राज्यातील आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब राजस्थानच्या झुंझुनू या जिल्ह्यातील चिडावा याठिकाणी स्थलांतरीत झाले होते. दिव्या मित्तल २००७ साली आरएएस परिक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. त्यानंतर त्या राजस्थान पोलिस सेवेत रुजू झाल्या. पोलिस सेवेत रुजू होण्याआधी कुटुंबाचा गाडा चालविण्यासाठी त्यांनी महाविद्यालयात लेक्चरर म्हणून काम केले होते. पोलिस सेवेत रुजू झाल्यामुळे जिल्ह्यात त्यांचे खूप कौतुक करण्यात आले होते.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# नोकरी - करियर, भविष्यात अंधार की प्रकाश ?

आधुनिक केसरी

**आजकाल तरुण पिढीच्या मनात भविष्य विषयी, नोकरी, व्यवसाय संदर्भात अनेक संभ्रम आहेत.गैरसमज आहेत.कोणते कोर्सेस केले तर नोकऱ्या मिळतील,कोणत्या क्षेत्रात मंदी आहे, किती शिकावे,काय अन् कसे शिकावे, म्हणजे भविष्यात अडचणी येणार नाहीत, अशा प्रकारचे हे प्रश्न आहेत.गेल्या दोन तीन वर्षात कोरोना मुळे,अन् सरत्या वर्षातील युक्रेन,रशिया युध्दामुळे परिस्थिती अतिशय खालावली आहे.ही दोन्ही संकटे काही प्रमाणात अनपेक्षित स्वरूपाची असल्याने कोणतेही देश त्यासाठी तयार नव्हते. कुणाजवळ ही त्यासाठीची उपाय योजना नव्हती. त्यामुळे या संभ्रमाच्या वातावरणात चहू बाजूंनी भर पडत गेली.**

गेल्या काही दशकांत आय टी क्षेत्र भरभराटीला आले होते. भरपूर पगार, सोयी, सवलती, नवे प्रोजेक्ट्स, बौधिक आव्हाने, असे पोषक वातावरण होते.खरे पाहिले तर ही आव्हाने,कामाच्या नवीन संधी आजही आहेत. पण त्याचे स्वरूप बदलले आहे. शिवाय आर्थिक मंदी मुळे रिस्क घेणे अवघड जाते आहे. नफा वाढला तरच शेअर्स ची किंमत वाढते. तरच गुंतवणूक वाढते.असे हे दुष्ट चक्र आहे. परिस्थिती अशीच राहील का, त्यात सुधारणा होईल का या प्रश्नाची सहज सोपी उत्तरे नाहीत. कारण भविश्याचा अंदाज घेणे आता यापुढे अतिशय अवघड आहे हे कोरोणानेच आपल्याला शिकवले आहे.
भारताचा विचार करायचा झाला तर,युरोप,अमेरिका,अन् इकडे चीन यांच्या तुलनेत आपण अधिक सुरक्षित आहोत असे म्हंटले पाहिजे. आपल्याला कदाचित लक्झरी मिळणार नाही.पण जीवनाच्या आवश्यक गरजा भागवण्याठी अडचणीही येणार नाहीत. पण त्यासाठी आपली मनोवृत्ती बदलावी लागेल. अपेक्षा बदलाव्या लागतील. मुख्य म्हणजे बदलत्या प्रवाहाशी जुळवून घ्यावे लागेल. बरेच नवे काही शिकावे लागेल. मला हे काम जमणार नाही असे वाक्य प्रयोग चालणार नाहीत यापुढे.उलट, मला थोडा वेळ मिळाला तर मी हे देखील शिकेन असे धाडस दाखववे लागेल.आपण शाळा कॉलेजात जे शिकतो ते पायाभूत शिक्षण असते. ते विचार करायला शिकवते. निर्णय घ्यायला,विश्लेषण करायला शिकवते. त्याचा आपण कसा, कितपत उपयोग करू शकतो यावर आपले कौशल्य, आपली योग्यता ठरत असते. आपले पारंपारिक शिक्षण यासाठी आपल्याला स्वावलंबी, तयार करणारे नव्हते.पण नव्या शैक्षणिक धोरणात हे बदल आहेत.दुर्दैवाने केंद्र,राज्य सरकारे त्याच्या अम्मल बजावणी साठी हवे तितके गंभीर नाहीत. शाळा,कॉलेज , विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था सगळीकडे गो स्लो प्रकार सुरू आहे.एकमेकावर जबाबदारी ढकलणे सुरू आहे.
नोकऱ्या नाहीत असे नाही. त्यांचे स्वरूप बदलले आहे. सर्व्हिस क्षेत्र झपाट्याने विस्तारते आहे.मेडिकल, सायन्स, तंत्रज्ञान,सर्वच क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. एक खरे. सरकारी नोकरीच हवी हा आग्रह असेल तर मात्र अडचणी आहेत.कारण खरे सांगायचे तर प्रत्येक सरकारचे,आपल्याच नव्हे पर देशातले सुध्दा, दिवाळे निघाले आहे. सरकारचा,संस्थाचा निधी पगार वाटपातच खर्ची जातो. त्यामुळे पोस्ट असल्या तरी त्या भरल्या जात नाहीत. आज घडीला शाळा,कॉलेजेस,विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था यात अर्ध्या अधिक जागा रिकाम्या आहेत. कंत्राटी नेमणुका करून गाडे ढकलले जात आहे. सरकारी कार्यालयात तीच स्थिती आहे.याचा परिणाम त्या कार्यालयाच्या, संस्थेच्या गुणवत्तेवर,आऊटपुट वर होतो आहे. जी मंडळी विद्यापीठातून शिकून बाहेर येतात ती नोकरी साठी योग्य नसतात असाही एक मतप्रवाह आहे.
पण कोणतेही विद्यापीठ अमुक एका नोकरीसाठी रेडीमेड प्रॉडक्ट तयार करीत नाहीत. तुम्ही अनुभवानेच शिकत जाता.योग्य ट्रेनिंग दिले, मनोवृत्ती बदलली, परिश्रमाची तयारी ठेवली तर अल्पवधित नवे सारे शिकता येते. सर्व प्रथम स्वतःला काय आवडते ते ठरवा. मग त्या क्षेत्रात काळानुसार जे बदल होताहेत त्याचा अभ्यास करा. त्या अनुषंगाने आवश्यक ते कौशल्य आत्मसात करण्याची तयारी करा.त्यासाठी हवे ते सर्व प्रयत्न करा. मग तुम्हाला काळजीचे कारण उरणार नाही. तुझे कौशल्य काय,तू काय करू शकतोस,तू आमच्या कंपनी साठी कसे योगदान देऊ शकतोस या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला देता आली पाहिजे. मला सध्या पोहता येत नाही हे खरे, पण संधी मिळाली तर मी पंधरा दिवसात ते शिकेन ही वृत्ती, हा ATTITUDE हवा. मग नोकरी साठी अडचण येणार नाही.



आर्टीफिशियल इंटेलिजन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स अशा तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नोकऱ्या कमी झाल्यात,माणसाची गरज कमी झाली हे खरे आहे. या अन् अशाच शोधामुळे, एकूणच कार्य पद्धतीत बदल झालाय हे खरे.पण अजूनही अनेक बाबतीत माणसाला पर्याय नाही हे खरे.आजारी माणसाला दिलासा द्यायला माणूसच लागतो. यंत्र माणसाचे काम सोपे करतो. संगणक वेळ वाचवतो. चुका टाळतो. पण अनेक बाबतीत माणसा ची गरज असतेच.रोबोटिक मुळे शस्त्रक्रिया सोपी सहज होईल. डॉक्टरचा शस्त्रक्रियेचा ताण कमी होईल. पण निर्णय हे डॉक्टर लाच घ्यावे लागतील. उपचार डॉक्टरलाच ठरवावे लागतील. म्हणजे यंत्रामुळे, तंत्रज्ञानामुळे तुमच्या कामाचे स्वरूप बडलेल. ते सोपे होईल. अचूक होईल. पण तुमची गरज कमी होणार नाही.यातून वाचणारा वेळ तुम्ही वेगळ्या,सर्जनशील कामासाठी उपयोगात आणू शकाल हा फायदाच आहे. पूर्वी आता सारख्या रक्त, लघवी, एक्स रे, अशा तपासण्या नव्हत्या. तरी नाडी, जीभ, चेहरा वगैरे बघून निदान होत होतेच. आता या तपासण्या मुळे,यंत्रामुळे ते अधिक अचूक, सक्षम, झाले. निर्णय घेणे सोपे झाले. पण डॉक्टरची गरज संपलेली नाही. इतर क्षेत्रातही हीच स्थिती आहे. यापुढे एक विषय,एक स्पेशलायझेशन,असे एकांगी शिक्षण, ज्ञान उपयोगाचे नाही. विज्ञान तंत्रज्ञान संदर्भात निर्णय घेताना, समाजशास्त्र, पॉलिटिक्स, अर्थ शास्त्र, व्यवस्थापन,संगणक या संलग्न शाखांचे खोलात नव्हे पण थोडे थोडे ज्ञान गरजेचे आहे. त्यामुळे आंतर शाखीय शिक्षण महत्वाचे.शेतीचे उदाहरण घेऊ. उत्तम पीक काढायचे तर पूर्वी सारखे अंदाज बांधून निर्णय घेता येणार नाहीत. नवी खते, जमिनीची प्रकृती, पाण्याची उपलब्धता, हवामानाचा अंदाज, शेती साठी लागणारी यंत्र सामुग्री त्याचा वापर, हे सारे एकत्रित अभ्यासावे लागेल. नव्या पिढी साठी पोशाख,अलंकार यांचे डिझाईन करण्या पूर्वी त्यांची सातत्याने बदलणारी आवड निवड, त्या भागातले हवामान, सामाजिक चालीरिती, हा डेटा गोळा करून त्याचे विश्लेषण करावे लागेल. मोठ्या बाटलीतल्या दोनशे रुपयाच्या शाम्पू ला खेडेगावात मार्केट नसणार. पण तोच शाम्पू स्याचेट्स मध्ये दोन दोन रुपयांना विकला तर सहज खपेल. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. व्यवसाय सुरू करण्याचे धाडस आव्हान स्विकारायला हरकत नाही. रिस्क प्रत्येक क्षेत्रात असतेच. नुकतीच मेलबोर्न मधल्या भारतीय तरुणाची गोष्ट वाचली. त्याने तिकडे दोन वर्षानंतर शिक्षण अर्धवट सोडून चक्क चहाचे दुकान टाकले. मग हळू हळू बिस्कीट पाव वडे असे वाढवले. आज त्याची उलाढाल पाच कोटींची आहे.तो इकडून तिथे गेलेल्या विद्यार्थ्यांना पार्ट टाईम जॉब देतोय आपल्या दुकानात. दुकानाचे नाव देखील मजेशीर..ड्रॉप आऊट चायवाला! हा तरुण मस्त आनंदी आहे. यशस्वी आहे. यापुढे इन्फो, नॅनो, बायो टेक याशिवाय ए आय,रोबोटिक्स, यांचे संयुक्त फ्युजन जगाचा चेहरा मोहरा बदलून टाकणार आहे.तुम्ही आम्ही कुणीही यापासून अलिप्त राहू शकत नाही.एक मात्र खरे,हा सारा प्रगतीचा,विकासाचा तंत्राचा विचार करतांना आपल्यापुढे आपले गाव, आपले शहर, आपले राज्य, आपला देश आधी हवे.ग्लोबल विचार नंतर करावा. आपण आधी आपल्याच अवती भवतीच्या माणसासाठी, समाजासाठी काय करू शकू हे जास्त महत्वाचे. आपल्या प्राथमिक गरज भागविण्यासाठी अवती भवती बरेच रिसोर्सेस आहेत. आपले ज्ञान कौशल्य आजमावण्यासाठी अनेक संधी आहेत.सर्जनशीलतेला आव्हान देणाऱ्या बऱ्याच समस्या आहेत.हे सारे कुणी फुकटात घेणार नाही. तुमच्या ज्ञानाची,कौशल्याची कदर करणारे,त्याचे मुल्य चुकवणारे देखील तयार आहेत. किंबहुना सारे जगच नेहमी नाविन्य,सर्जनशीलता,प्रतिभा याच्या शोधात असते. दहा बारा वर्षे वयाच्या खेड्यातल्या गरीब घरच्या मुलीला, तिच्या संगीत प्रतिभे साठी डोक्यावर घेताना आपण सा रे ग म कार्यक्रमात टी वी वर बघतोच की! त्यामुळे आम्हाला कुणी विचारत नाही,आमचे भविष्यात काय होईल, आम्हाला संधी मिळेल की नाही, असा आरडाओरडा आता बंद केलेला बरा..संधी खूप आहेत. त्याच तुम्हाला शोधताहेत. त्यासाठी तुम्हाला कोषातून बाहेर यावे लागेल. आळस, नैराश्य, चिंता हे सगळे झटकून भविष्यातील नवनवीन आव्हानांना सामोरे जायला सज्ज व्हावे लागेल. शुभास्ते पंथाना संतू



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# टेनिस स्टार सोनियाची निवृत्ती

आधुनिक केसरी

**भारताची आघाडीची महिला टेनिस खेळाडू सानिया मिर्झाने आंतरराष्ट्रीय टेनिस मधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. वाढत्या दुखापती अणि हरवलेला फॉर्म त्याचसोबत कौटुंबिक कलह या कारणांमुळे सानियाने हा निर्णय घेतल्याची शक्यता आहे. या बाबतची घोषणा तिने स्वतःच केली असून पुढील महिन्यात दुबईत होणारी दुबई टेनिस चॅम्पियनशिप ही तिच्या कारकिर्दीतील शेवटची स्पर्धा असून या स्पर्धेनंतर ती व्यावसायिक टेनिसला कायमची रामराम ठोकणार आहे.**

वास्तविक मागील वर्षांच ती टेनिसला रामराम ठोकेल अशी शक्यता व्यक्त केली जात होती तरीही ती एक वर्ष खेळत राहिली मात्र त्यात तिला विशेष काही करता न आल्याने अखेर तिने यावर्षी निवृत्तीवर शिक्कामोर्तब केले आहे. सानिया मिर्झाचा हा निर्णय अपेक्षितच होता कारण आता तिचे वय ३६ वर्ष आहे. कोणत्याही खेळातील खेळाडूंसाठी हे वय निवृत्तीचेच असते. त्यात टेनिस खेळातील खेळाडूंना जबरदस्त फिटनेस हवा असतो त्यामुळे तीस वर्षानंतर हे खेळाडू निवृत्ती स्वीकारतातच. सानिया मिर्झाने स्वतः याबाबत सांगितले की माझे शरीर कमजोर झाले असून गुडघे सतत दुखत असतात. कोणत्याही खेळांमध्ये जिंकणे हेच महत्वाचे नसते तर खेळण्याचा आनंदही घेता आला पाहिजे. मी खेळाचा आनंद घेऊ शकेल असे वाटत नाही. माझी प्रेरणा माझी ऊर्जा आता कमी झाली आहे. सानियाच्या या वक्तव्यावरुन तिची आता पुढे खेळायची इच्छा नाही असेच दिसून येते. सानिया मिर्झाचा हा निर्णय तिच्या चाहत्यांनी देखील स्वीकारला असून त्यांनी तिच्या या निवृत्तीचे स्वागत केले आहे. सानियाने २००३ मध्ये व्यावसायिक टेनिसमध्ये पदार्पण केले याचाच अर्थ यावर्षी तिच्या कारकिर्दीला वीस वर्ष पूर्ण होत आहेत. कोणत्याही खेळाडूसाठी सलग वीस वर्षे खेळत राहणे ही खूप मोठी बाब आहे कारण सतत वीस वर्ष स्वतःचा फिटनेस ठेवत उत्तम कामगिरी करत राहणे ही वाटते तेवढी सोपी बाब नाही सानियाने ती साध्य केली याबाबत सानियाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. या दरम्यान तिने अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे. अविरत २० वर्ष आंतरराष्ट्रीय सामने खेळून तिने भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत. तिने तिच्या संपूर्ण कारकिर्दीत सहा ग्रँडस्लॅम स्पर्धा



जिंकल्या आहेत. महिला दुहेरीमध्ये २०१६ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन, २०१५ मध्ये विम्बल्डन आणि अमेरिकन ओपन, २००९ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन, २०१५ मध्ये फ्रेंच ओपन आणि २०१४ मध्ये अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकली आहे. भारताच्या कोणत्याही महिला टेनिस खेळाडूंनी देशासाठी इतकी दैदिप्यमान कामगिरी केलेली नाही. महिला एकेरी मध्येही तिने पहिल्या १०० खेळाडूत स्थान मिळवले होते.
महिला एकेरीत पहिल्या १०० खेळाडूत समाविष्ट होणारी ती भारताची एकमेव महिला टेनिसपटू आहे. तिने तिच्या कारकिर्दीत मार्टिना हिंगिस, स्वेटलाना कुजनेतसेवा, नाडीया पेगोवा यासारख्या महान खेळाडूंना पराभवाची धुळ चारली आहे. सानिया ही केवळ भरताचीच नाही तर जगातील उत्कृष्ट खेळाडू म्हणून गणली जाते. विशेषतः महिला दुहेरीमध्ये ती जगातील महान खेळाडू म्हणून गणली जाईल यात शंका नाही. भारताची तर ती अव्वल खेळाडू म्हणूनच गणली जाईल. निवृत्ती नंतरच्या कारकिर्दीसाठी सानियाला मनापासून शुभेच्छा !

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भारत-पाकिस्तान फाळणीचे तीव्र विरोधक !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**_खान अब्दुल गफारखान हे सरहद्द गांधी व बादशाह खान या नावाने प्रसिद्ध होते. ते वायव्य सरहद्द प्रांतातील स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये भाग घेतला होता. भारतरत्न पुरस्कार मिळालेले हे पहिले अभारतीय व्यक्ती होत. त्यांनी सन १९२९मध्ये खुदाई खिदमतगार ही संघटना उभारली होती. या संघटनेच्या सदस्यांना लाल डगलेवाले म्हणून ओळखतात. ही संघटना सुर्ख पोश या नावाने देखील ओळखली जात होती. पुढे वाचा श्री निकोडे कृष्णकुमार गुरूजींचा हा लेख...**

अब्दुल गफ्फार खान हे एक राजनैतिक आणि आध्यात्मिक नेता होते. त्यांना महात्मा गांधीसारखे अहिंसा आंदोलनासाठी ओळखले जात होते. ते गांधीजींचे समर्थक होते. ब्रिटिश इंडियामध्ये त्यांना फ्रंटियर गांधी या नावाने संबोधले जायचे. खुदाई खिदमतगारच्या यशामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्या व समर्थकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही जण या दडपशाहीस बळी पडले. बच्चा खानने अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या भारत फाळणीच्या मागणीचा जोरदार विरोध केला. जेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने विभागीय योजनेची स्वीकृती जाहीर केली तेव्हा विभाजनानंतर त्यांनी पाकिस्तान सोबत राहण्याचा निर्णय घेतला.

खान अब्दुल गफारखान यांचा जन्म दि.६ फेब्रुवारी १८९०मध्ये ब्रिटिश इंडिया पेशावर, पाकिस्तान येथील उत्मानजई येथे झाला. त्यांचे वडील बहराम हे तेथील जमीनदार होते. स्थानीय पठाण लोकांचा विरोध असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना व त्यांच्या भावाला मिशन स्कूलमध्ये शिकवले. त्यानंतर त्यांनी त्यांचे शिक्षण अलीगढ मुस्लिम महाविद्यालयात पूर्ण केले. सन १९१०मध्ये त्यांनी आपल्या गावामध्ये एक शाळा उघडली. त्यानंतर ते स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाले. सन १९१५साली ब्रिटिशांनी त्यांच्या शाळेवर बंदी घातली. सरहद्द गांधी यांना स्वतंत्र आणि धर्मनिरपेक्ष असा भारत देश पाहिजे होता. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी त्यांनी सन १९२९ मध्ये खुदाई खिदमतगार नावाची संघटना उभारली होती. ही संघटना सुर्ख पोश तसेच लाल डगेलेवाले या नावाने देखील ओळखली जात होती. या संघटनेची स्थापना म.गांधीजींच्या अहिंसा आणि सत्याग्रह यांसारख्या सिद्धांताने प्रेरित होऊन केली होती. या संघटनेमध्ये साधारणतः एक लक्ष सदस्य सामील झाले. त्यांनी शांततापूर्वक इंग्रज पुलिसांचा विरोध केला. खान अब्दुल गफारखान हे म.गांधींचे एकनिष्ठ अनुयायी व पख्तुनांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य नेते होते. त्यांचा जन्म पेशावरजवळील उत्मानझाई या खेड्यात एका श्रीमंत घराण्यात झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पेशावर येथे झाले. त्यांनी लष्करात गाइड्स या तुकडीत नोकरी धरली. गोऱ्या अधिकाऱ्यांकडून हिंदी लष्करी अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक मिळत होती. म्हणून लष्करी नोकरीचा त्याग करून ते अलीगढ विद्यापीठात शिक्षणासाठी गेले. सन १९१०पासून आपल्या प्रदेशात राष्ट्रीय शाळा काढून पठाण बांधवांत जागृती व देशप्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला.

रौलट ॲक्टसारख्या जुलमी कायद्याविरूद्ध महात्मा गांधीनी सुरू केलेल्या आंदोलनात गफारखानांनी सक्रिय भाग घेऊन वायव्य सरहद्द प्रांतात चैतन्य निर्माण केले. सन १९२०च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनात त्यांनी भाग घेतला तसेच आपल्या प्रांतात खिलाफत चळवळ संघटित केली. सन १९२४मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी सामाजिक सुधारणांचे कार्य हाती घेतले. सन १९२९मध्ये म.गांधी, नेहरू, मौलाना आझाद आदी भारतीय पुढाऱ्यांशी त्यांचा परिचय होऊन काँग्रेस चळवळीत ते सामील झाले. याच कार्यास मदत व्हावी, म्हणून खुदाई खिदमतगार ही स्वयंसेवक



संघटना त्यांनी स्थापन केली. पठाण जमातीत सत्य, अहिंसा, शिस्त व राष्ट्रप्रेम निर्माण करणे, हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. ब्रिटीश सरकारचा रोष होऊन ही संघटना बेकायदेशीर ठरविण्यात आली. नंतरच्या सत्याग्रहात त्यांना पुन्हा कारावास भोगावा लागला.

काँग्रेसचे अध्यक्ष पद गफारखानांना दोनदा देऊ केले असता आपण केवळ एक सेवक आहोत, असे म्हणून त्यांनी ते नाकारले. एवढेच नव्हे तर प्रांतीय अगर अखिल भारतीय निवडणुकीस उभे राहण्याचेही त्यांनी कधीच मान्य केले नाही. अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीचे ते सन १९४७च्या फाळणीपर्यंत सदस्य होते. सन १९२०-४७पर्यंत त्यांनी एकंदर चौदा वर्षांचा तुरुंगवास भोगला. विभाजनानंतर बच्चा खान यांनी पाकिस्तानशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली, पण सन १९४८-५४च्या दरम्यान पाकिस्तानी सरकारने त्यांना वारंवार अटक केली. सन १९६९मध्ये पुन्हा युनिट कार्यक्रमाच्या विरोधात त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या वाटाघाटीत भारताचे विभाजन होण्याची चिन्हे दिसताच त्याला गफारखानांनी तीव्र विरोध तर केलाच, परंतु विभाजन झालेच तर वायव्य सरहद्दीवरील पठाणांचा स्वायत्त पख्तुनिस्तान झाला पाहिजे, असाही त्यांनी आग्रह धरला. परंतु त्यांचा प्रयत्न निष्पळ ठरला आणि सरहद्द प्रांत पाकिस्तानचाच एक भाग झाला. भारतीय पुढाऱ्यांनी आम्हाला लांडग्यांच्या ताब्यात देऊन स्वतःला स्वातंत्र्य मिळविले, असे दुःखपूर्ण उद्गार त्यांनी त्यावेळी काढले होते. म.गांधींच्या आदेशानुसार ते आपल्या प्रांतात गेले. पाकिस्तानशी एकनिष्ठ राहण्याची त्यांनी शपथही घेतली. पण आपल्या प्रदेशासाठी स्वायत्तता मिळाली पाहिजे, असा आग्रहही त्यांनी धरला. त्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात येऊन त्यांची खुदाई खिदमतगार संघटना बंद करण्यात आली. पाकिस्तान स्वतंत्र झाल्यापासून सन१९६४पर्यंत जवळजवळ ते पाकिस्तानी तुरुंगातच राहिले. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे सप्टेंबर १९६४मध्ये गफारखानांना इंग्लंड येथे जाण्याची पाकिस्तान सरकारने परवानगी दिली. पाकिस्तानात परत येणे धोक्याचे आहे, हे जाणून ते डिसेंबरमध्ये अफगाणिस्तानात गेले. गांधी जन्मशताब्दी महोत्सवात भाग घेण्यासाठी गफारखान भारत सरकारच्या निमंत्रणानुसार ऑक्टोबर १९६९मध्ये भारतात आले. येथील मुक्कामात त्यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी योजण्यात आलेले नेहरू पारितोषिक देण्यात आले. भारतासाठी केलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारतीयांनी त्यांना थैली अर्पण केली. सरहद्द प्रांतातील म.गांधींसारखी महान व्यक्ती म्हणून त्यांना सरहद्द गांधी असे गौरवाने संबोधिले जाते. त्यांचा मृत्यू दि.२० जानेवारी १९८८ रोजी पेशावर येथे झाला.

# स्वच्छ ऊर्जेचे नवे युग अवतरेल ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतात सध्या विजेचे मोठे संकट नाही, परंतु भविष्यातील गरजा आणि स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करण्याच्या संकल्पांचा एक भाग म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनला मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, या अभियानांतर्गत, भारताला ऊर्जा-स्वतंत्र बनवण्याची, अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्रांचे डीकार्बोनाइज (कार्बन मुक्त) करण्याची आणि पर्यायी इंधनाचे उत्पादन, वापर आणि निर्यातीसाठी जागतिक केंद्र बनवण्याची योजना आहे.**

या मोहिमेअंतर्गत भारत 2030 पर्यंत 50 लाख टन हायड्रोजन उत्पादन क्षमतेचे लक्ष्य गाठेल अशी अपेक्षा आहे. विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करू पाहणाऱ्या भारतासारख्या देशांसाठी ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरता मिळवणे ही सर्वात मोठी गरज आहे, यात शंकाच नाही. आपल्याला आणखीही कारखाने काढायचे आहेत, उत्पादन वाढवायचे आहे, लाखो तरुणांना रोजगार निर्माण करायचा आहे. यासाठी स्वच्छ ऊर्जा लागते. आजचे वास्तव हे आहे की भारत उर्जेच्या बाबतीत पूर्णपणे स्वयंपूर्ण नाही.

जीवाश्म इंधन ( पेट्रोल-डिझेल ) च्या रूपाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याला दरवर्षी सुमारे बारा लाख कोटी रुपये आयातीवर खर्च करावे लागतात. त्याचबरोबर जनतेला माफक दरात पेट्रोल आणि डिझेल उपलब्ध करून द्यावे लागते आणि आर्थिक संकटामुळे ते देण्यात अडचणी येत आहेत. सौरऊर्जेचा एक पैलू जो अलिकडच्या वर्षांत चर्चेचा विषय बनला आहे तो म्हणजे सौर पॅनेल आणि संबंधित नवीन तंत्रज्ञानासाठी आपले परदेशावरील अवलंबित्व. तथापि, तरीही काही ठोस योजना सावधपणे अंमलात आणल्यास जनतेला दिलासा देऊन ऊर्जा स्वावलंबन साध्य करता येईल. विशेषतः हायड्रोजन हे स्वच्छ इंधन आहे आणि एकदा कार्यक्षम झाले की ते अनंतकाळासाठी अमर्यादित ऊर्जा प्रदान करू शकते. पण यात काही समस्याही आहेत. यासाठीची एक मोठी अडचण म्हणजे त्याची दाबाखाली साठवणूक करणे, कारण ते अत्यंत स्फोटक आहे आणि त्यामुळे अपघात होऊ शकतात.

मात्र राष्ट्रीय हायड्रोजन मिशनमध्ये यासंबंधीच्या सर्व समस्यांचे निराकरण होईल, अशी अपेक्षा आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हायड्रोजन इंधन स्वस्त करणे. यालाही प्राधान्य द्यावे लागणार आहे. कोळशापासून मिळणारी वीज महाग होत चालली असून कोळशाचा तुटवडाही कधी कधी जाणवतो आहे. सध्या तसे हे मोठे संकट नाही. परंतु वाढत्या ऊर्जेच्या मागणीमुळे कोळशाचे भविष्य अंधकारमय दिसून येते. अशा परिस्थितीत, एकतर अणुऊर्जेकडे वाटचाल करणे किंवा हायड्रोजन इंधनासह स्वच्छ उर्जेचे इतर पर्याय वापरणे चांगले होईल. हायड्रोजनचा पर्याय मिळाल्यावर आपल्या देशात कच्चे तेल, कोळसा इत्यादी जीवाश्म इंधनांच्या आयातीत एक लाख कोटी रुपयांपर्यंत घट येऊ शकते. एक अप्रत्यक्ष फायदा असा आहे की यामुळे हरितगृह वायू उत्सर्जन 5 कोटी टन कमी होऊ शकते. पेट्रोल आणि डिझेल यांसारख्या जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व काढून टाकून देशाला स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे केंद्र बनवणे हा राष्ट्रीय हायड्रोजन मिशनचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

हे खरे आहे की हायड्रोजन हे सध्या आपल्या ग्रहावर उपलब्ध असलेले सर्वात स्वच्छ इंधन आहे. परंतु समस्या अशी आहे की पृथ्वीवरील सर्व हायड्रोजन इतर घटकांमध्ये ( जसे की पाणी आणि इतर हायड्रोकार्बन्स ) बांधलेला आहे. अशा परिस्थितीत तो वेगळे करण्याच्या प्रक्रियेत प्रदूषण होते. म्हणूनच त्याला स्वच्छ किंवा हिरवा हायड्रोजन म्हणता येणार नाही. अशा समस्यांवर उपाय म्हणजे राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन. हे उल्लेखनीय



आहे की इलेक्ट्रोलिसिस प्रक्रियेद्वारे इंधन तयार करण्याची प्रक्रिया पूर्णपणे कार्बन उत्सर्जन मुक्त आहे. सध्या हायड्रोजन इंधन तयार करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिली पद्धत म्हणजे हायड्रोजन इंधन इलेक्ट्रोलिसिसद्वारे म्हणजे पाण्यामधून वीज पार करून मिळवणे. दुसरा मार्ग म्हणजे इंधन तयार करण्यासाठी नैसर्गिक वायूपासून हायड्रोजन आणि कार्बन वेगळा करणे. इलेक्ट्रोलिसिस प्रक्रियेद्वारे उत्पादित हायड्रोजन इंधनामध्ये स्वच्छ ऊर्जा वापरली जाते.

सौर किंवा पवन ऊर्जा केंद्रातून मिळणारी वीज वापरून इलेक्ट्रोलायझिंग पाण्याने हायड्रोजन वेगळे केले जाते. अशा इंधनाला 'ग्रीन' हायड्रोजन किंवा ( जीएच ) GH-2 किंवा हिरवे इंधन म्हणतात. या प्रकारच्या ऊर्जेबद्दल असा दावा केला जात आहे की त्याचा सर्वात मोठा फायदा तेल शुद्धीकरण, खत निर्मिती, सिमेंट, स्टील आणि अवजड उद्योगांना होईल, कारण तेथे सीएनजी आणि पीएनजी मिश्रित हायड्रोजन इंधन वापरल्यास हे अवजड उद्योग कार्बनमुक्त होतील. सध्या जगातील ग्रीन हायड्रोजनच्या किमती अनेक घटकांवर अवलंबून आहेत. उदाहरणार्थ, त्याचा स्रोत काय आहे, बाजारातील परिस्थिती काय आहे आणि व्यवहार केलेल्या चलनाचे दर काय आहेत. सध्या जगात ग्रीन हायड्रोजन तयार करण्यासाठी सरासरी 300 रुपये प्रति किलो खर्च येतो. नैसर्गिक वायूपासून बनवलेला तो प्रतिकिलो 130 रुपयांपर्यंत असला तरी रशिया-युक्रेन युद्धामुळे ही सरासरीही 250 रुपयांवर पोहोचली आहे. अशा परिस्थितीत या स्वच्छ इंधनाच्या किमती कमी करण्यासाठी ग्रीन हायड्रोजन मिशन खूप पुढे जाऊ शकते. केवळ भारतच नाही तर सध्या जगातील पंचवीस देश ग्रीन हायड्रोजन निर्मितीच्या दिशेने वेगाने काम करत आहेत.

स्वच्छ इंधनाला आणखीही काही पर्याय आहेत. हिरव्या हायड्रोजन व्यतिरिक्त, उसाच्या मोलॅसिसमधून काढलेले इथेनॉल देखील एक स्वच्छ इंधन आहे. ती जाळून निर्माण होणारी वीज ही अनेक अर्थांनी इतर पर्यायांपेक्षा सुलभ आणि चांगली मानली जाते. भारतातही इथेनॉलपासून ऊर्जा मिळवण्याचा ट्रेंड सुरू झाला आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर इथेनॉलवर बस आणि ट्रेनही चालवल्या जात आहेत. स्वच्छ विजेचा आणखी एक प्रकार आहे. स्वच्छ ऊर्जा आपल्याला सूर्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेकडे घेऊन जाते. या संदर्भात भारताचे महत्त्व त्यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडीवरून स्पष्ट होते. 2015 मध्ये, पॅरिसमधील हवामान बदल परिषदेत एक उल्लेखनीय पुढाकार घेऊन, भारताने 100 देशांची सौर युती स्थापन करण्याची घोषणा केली. या युती अंतर्गत भारताने 2030 पर्यंत 450 गीगावाट ( GW ) ऊर्जा उत्पादनाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यापैकी 100 गीगावाट ( GW ) चे उद्दिष्ट गाठण्यात आले आहे.

याचा अर्थ देशाला शून्य कार्बन उत्सर्जन करणारा देश बनवण्याचा मार्ग फारसा अवघड नाही. दरवर्षी सुमारे सहा अब्ज टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन रोखण्यासाठी सौर तंत्रज्ञान 2050 पर्यंत पुरेशी वीज निर्माण करू शकेल. उत्सर्जनाचे हे प्रमाण सध्या संपूर्ण जगाच्या वाहतूक क्षेत्राद्वारे सोडल्या जात असलेल्या कार्बन डायऑक्साइडच्या प्रमाणात आहे. प्रदूषण टाळण्यासाठी अणुऊर्जा हादेखील एक चांगला पर्याय आहे. आता अणुऊर्जा प्रकल्पही पूर्वीपेक्षा खूपच सुरक्षित मानले जातात. पण सध्या भारत आपल्या अणुऊर्जा केंद्रांमध्ये केवळ दोन ते तीन टक्के अणुऊर्जा निर्माण करू शकतो. अणुऊर्जा प्रकल्प उभारणे तसे खूप महाग आहे आणि त्याचे मुख्य इंधन असलेले युरेनियम आयात करण्यासाठी ऑस्ट्रेलियासारख्या विकसित देशांवर अवलंबून राहणे हे एक वेगळे संकट आहे.

पर्यावरणीय कारणांमुळे या प्रकल्पांना प्रचंड विरोध होतो. याशिवाय पेनसिल्व्हेनिया ( अमेरिका ) येथील थ्री माईल आयलंड, चेरनोबिल ( रशिया ) आणि फुकुशिमा अणुभट्टीच्या गळतीच्या घटना, जुने आणि जीर्ण अणु प्रकल्प, किरणोत्सर्गी कचऱ्याची विल्हेवाट आणि युरेनियमची कमतरता या समस्या अणुऊर्जेच्या मार्गात अडथळा ठरत आहेत. सौर आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ इंधनासाठी चांगले पर्याय आहेत, परंतु सौर पॅनेलची देखभाल करणे एक त्रासदायक आहे आणि पवन ऊर्जा अनियमित, व्यापक स्वरूपात पसरलेली आहे आणि निश्चित स्वरूपात पकडणे कठीण आहे.

# विमान अपघातांचा केंद्रबिंदू ठरतोय नेपाळ



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**गेल्या 30 वर्षात आतापर्यंत 27 मोठे विमान अपघात नेपाळमध्ये झाल्याचे सांगितले जाते.यात 1992 मध्ये दोन मोठे अपघात झालेत.यात जुलै महिन्यात थाई एअरलाईन्सच्या विमानाला झालेल्या अपघातात 113 जणांचा मृत्यू झाला तर सप्टेंबरमध्ये पाकिस्तान एअरलाईन्सचे विमान कोसळुन त्यात 167 लोकांचा मृत्यू झाला होता.यावरून असे वाटते की नेपाळचे आकाश विमानांसाठी मृत्यूचा काळ ठरत असल्याचे दिसून येते. . याचीच पुनरावृत्ती दिनांक 15 जानेवारी रविवारला दिसून आली.**

यती एअरलाईन्सच्या एटीआर-72 विमानाने सकाळी 10 वाजून 33 मिनिटांनी काठमांडूच्या त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले 11 च्या सुमारास पोखरा विमानतळावर उतरत असताना जुन्या व नवीन विमानतळाच्या दरम्यान सेती नदीच्या काठावर दरीत कोसळले. यात 10 परदेशी नागरिकांसह 68 प्रवासी आणि 4 विमान कर्मचाऱ्यांसह एकुण 72 जणांचा मृत्यू झाला.यात पाच भारतीय सुध्दा होते.नेपाळमधली या भागातील ही घटना पहिली नसुन मे -2012 ला पोखराहून जोमसोमला जाणारे विमान जोमसोम विमानतळाजवळ कोसळुन 15 ठार झालेत, सप्टेंबर-2012 ला सीता एअरचे विमान त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपात्कालीन लॅंडिंग करतांना कोसळुन 19 ठार झालेत,फेब्रुवारी 2016 ला याच मार्गावर उड्डाण करणारे तारा एअरलाईन्सचे विमान टेकऑफ नंतर कोसळले यात 23 लोकांचा मृत्यू झाला,मार्च 2018 ला त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर अमेरिका -बांग्लादेश विमानाचा अपघात झाला यात 51 ठार झालेत, मे-2022 ला नेपाळच्या मुस्तांग जिल्ह्यात तारा एअरचे विमान कोसळुन 22 जणांचा मृत्यू झाला. हे संपूर्ण अपघात एकाच मार्गावर झाल्याचे सांगितले जाते. जनुकाय नेपाळला विमान अपघातांनी जखडले की काय असे वाटत आहे.अशाप्रकारे विमान अपघातांच्या श्रेणीत नेपाळ अव्वल स्थानी असल्याचे दिसून येते हा



अत्यंत गंभीर, धक्कादायक आणि चिंताजनक विषय आहे.आधुनिक युगात रस्ते अपघात ज्याप्रमाणे वाढत आहे त्याचप्रमाणे जगभरात विमान अपघातात मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते. जगभरात गेल्या पाच वर्षांत विमान अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून यात असंख्य जणांना आपले प्राण गमवावे लागले यात आपल्याला अनेक कारणे दिसून येतील.कारण वाढत्या हवामानातील बदल, ग्लोबल वॉर्मिग, वाढते तापमान, ग्लेशियर वितळले,वाढते प्रदुषण आणि निसर्गाचा होणारा ह्यास यामुळे आकाशातील हवामानात मोठ्या प्रमाणात बदलाव झाल्यामुळे विमानाचे अपघात वाढल्याचे दिसून येते.हिमालयाच्या कुशीत वसलेल्या देशात विमान अपघात मोठ्या प्रमाणात होतांना दिसते यात प्रामुख्याने नेपाळ, इंडोनेशिया, इजिप्त, रशिया, पाकिस्तानसह अनेक देशांत आपल्याला विमान अपघात जास्त दिसून येते. आकाशातील हवामान बदलामुळे विमान अपघातच नाही तर पक्षांचेसुध्दा जगने व उडने अत्यंत कठीण झाले आहे त्यामुळे त्यांना अनेक कठीणाईचा सामना करावा लागतो व मृत्यूशी झुंजावे लागते. त्यामुळे आपल्याला असे म्हणता येईल की आकाशातील वाढत्या हवामानातील बदलामुळे पक्षांच्या मृत्यूचे प्रमाण व विमानांचे अपघात यात दिवसेंदिवस वाढत आहे.याकरीता जगाने बदलत्या काळानुसार बदलत्या हवामानाकडे लक्ष केंद्रित करून निसर्गाला वाचविण्यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करायला पाहिजे.यामुळे आकाशातील हवामान स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.यामुळे विमान अपघातांवर मोठ्या प्रमाणात आळा बसेल.याकरिता सर्वच स्तरातुन निसर्ग वाचविण्याचा प्रयत्न व्हायला हवेत.नेपाळमधील विमान अपघातात मृतांच्या भावपूर्ण श्रद्धांजली!

# आपण स्त्रियांच्या प्रतिभेपेक्षा पोशाखाची जास्त काळजी का करतो ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**विनयभंग, बलात्काराच्या सर्व घटना खरेच शॉर्ट आणि ट्रेंडी कपडे घालून घडतात का? महिलांच्या कपड्यांबाबत वेळोवेळी विधाने का केली जातात? सध्या सोशल मीडियावर, वर्तमानपत्रात, दूरचित्रवाणीवर सर्वत्र महिलांनी काय परिधान करावे आणि काय घालू नये यावर जोरदार वाकयुद्ध सुरु आहे . चित्रा वाघ व उर्फी यांच्यातील वाद अत्यंत विकोपाला गेला असून दोन्ही स्त्रिया समोरासमोर उभे ठाकले आहेत. उर्मी तोकडे कपडे घालत असल्याने चित्रा वाघ यांनी तिच्या विरोधात पोलिसात तक्रार केली व हा वाद वाढला. महिलांनी कोणते कपडे घालावे हा त्यांच्या वयक्तिक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. महिलांना त्यांच्या पेहरावाबद्दल निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांना जे कपडे घालायचे आहेत ते ते घालू शकतात. त्यांनाही आत्मनिर्णयाचा अधिकार आहे.**

जगाची अर्धी लोकसंख्या किती काळ पुरुषांच्या सांगण्यावर चालत राहणार? त्यांना समान हक्क कधी मिळणार? किती दिवस ते मर्दानी उद्धटपणाचे बळी बनत राहणार. शेवटी त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा, स्वामर्जिने कपडे घालण्याचा अधिकार का नसावा? तिला स्वतःचे निर्णय घेण्यापासून किती दिवस वंचित ठेवले जाणार? स्त्री स्वतः सक्षम आहे. आपली योग्यता, पात्रता स्त्रियांनी सिद्ध केली आहे.आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा वावर वाढला आहे.असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात स्त्रियांचा सहभाग नसेल, या पार्श्व भूमीवर स्त्रियांच्या अधिकारात हस्तक्षेप करणे न्यायसंगत आहे काय.?

मात्र आपल्या देशात स्त्रियांच्या कपडे परिधान करण्यावरून अनेकदा वाद उफाळून आला आहे.
'स्त्रियांनी तोकडे कपडे घालू नये ' अंग प्रदर्शन करू नये " जीन्स पँट व टी शर्ट घालू नये 'असे वक्तृत्व पाहून आणि ऐकून मन सुन्न होऊन जाते! कुठे आपण चंद्र-मंगळावर जाण्याबद्दल बोलतो, कुठे स्त्री-पुरुष समानतेबद्दल बोलतो आणि कुठे आपली विचारसरणी स्त्रियांच्या कपड्यांभोवती फिरत राहते! अहो...स्त्रियांना थोडा श्वास घेऊ द्या... त्यांना इतकं स्वातंत्र्य द्या की त्यांना हवे ते घालता येईल!! काही पुरुष तर त्याही पुढे जाऊन सांगतात की मुलींनी नाभीच्या खाली जीन्स घालू नये साडीचा ब्लाउज नेक जास्त खोल ठेवू नये! हे पुरुषांच्या भावनांना उत्तेजित करते. मुलींच्या पेहरावावर भाष्य करणारे काही वडील आहेत, ज्यांच्या स्वतःच्या मुली आधुनिक कपडे घालतात, पण इतर मुलींना/स्त्रियांना शालीनता शिकवतात. महिलांना शालीनतेचा धडा शिकवणारे हे वडील आपल्या घरच्या सुनेला हे नियम लागू करत नाहीत!
महिलांसोबतच्या तोडफोडीची कोणतीही बातमी जेव्हा हेडलाईनमध्ये येते, तेव्हा कोणतीही प्राथमिक माहिती न



देता लोकांची पहिली प्रतिक्रिया असते की, ही सगळी आधुनिकतेची मागणी आहे, स्त्रिया प्रक्षोभक कपडे घालतात, म्हणूनच...! विनयभंग, बलात्काराच्या सर्व घटना खरेच शॉर्ट आणि ट्रेंडी कपडे घालून घडतात का? नुकत्याच झालेल्या बुलंदशहर सामूहिक बलात्कारात त्या आई-मुलींनी चिथावणीखोर कपडे घातले होते का? साध्या वेशात आणि कुटुंबियांसोबत राहत असतानाही तिच्यावर सामूहिक बलात्कार का झाला? दोन-तीन वर्षांच्या निष्पाप मुलींवर बलात्कार का होतात? खरं तर, स्त्री किती शरीर दाखवते किंवा किती लपवते हे महत्त्वाचे नाही, कारण सेक्स डोक्यात जन्म घेते आणि संपूर्ण शरीराला कंपन करतात. बलात्कार किंवा विनयभंगाच्या घटना कपड्यांमुळे घडत नाहीत, तर त्या गलिच्छ, आजारी आणि विकृत मानसिकतेमुळे घडतात.

स्वतंत्र देशातील महिलांना इतके स्वातंत्र्य का नाही की त्या त्यांच्या आवडीचे कपडे घालू शकतील.
महिलांच्या कपड्यांबाबत वेळोवेळी विधाने का केली जातात? स्त्रियांनी कधी पुरुषांच्या कपड्यांवर टिप्पणी केली आहे का? जेव्हा पुरुष त्यांना हवे ते घालू शकतात, तर महिला का करू शकत नाहीत? काही लोकांना महिलांच्या लहान कपड्यांबद्दल काही अडचण नसते, त्यांना पी.व्ही.सिंधूने साडी नेसल्यावर विधाने करण्याची संधीही मिळते! भाऊ... खेळाच्या मैदानावर लहान कपडे घालणे सोयीचे असेल तेव्हा लहान कपडे घाला. मंदिरात जाताना साडी नेसायची होती, म्हणून साडी नेसली! आमच्या विचारसरणीला काय झाले आहे? आपण प्रतिभेपेक्षा तिच्या पोशाखाची जास्त काळजी का करतो? आपला समाज हा पुरुषप्रधान समाज आहे हे मान्य, पण "ज्याची काठी त्याची म्हैस" हा जंगलाचा नियम होता. खरे तर काडीपासून मुक्त होणे म्हणजे सुसंस्कृत असणे होय. पुरुषांनी हे समजून घेतले पाहिजे.

खरं तर या गोष्टीच्या मुळाशी फक्त मर्दानी अहंकार कार्यरत असतो. स्त्रियांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत असे पुरुषांना वाटत नाही. आजच्या अवकाशयुगातही स्त्रियांनी पायात चपला ठेवाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. त्याला महिला पुरुषांच्या बरोबरीने नको आहेत. पुरुषांना स्त्रियांना आपल्या तालावर नाचवायचे आहे तिला माकडासारखे आपल्या बोटांवर नाचवायचे आहे. त्याला (माणूस) असे वाटते की मी जे काही बोलतो/करतो ते पूर्णपणे सत्य आहे, परंतु प्रत्यक्षात तसे नाही. मी सांगतो तसंच स्त्रियांनी केलं पाहिजे, असं त्याला वाटतं. स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या नावाखाली तोकडे कपडे घालून अंग प्रदर्शन करावे असे मला हे सर्व म्हणायचे नाही. पण पुरुषांसह स्त्रियांनाना नम्र विनंती आहे की कृपया मुलींना/महिलांना इतकं स्वातंत्र्य द्यावं की स्त्रियांनी काय घालावं आणि काय घालू नये!!




# साप हा शेतकऱ्यांचा मित्र

आधुनिक केसरी

**दोन तोंडांचा साप :** पुरातन काळापासून आपण सापांना अनेक तोंडे असल्याचे ऐकले आहे, उदाः- पाच तोंडांचा (फण्यांचा) भुजंग नाग, कालिया नाग. पण इतक्या तोंडांचा साप आजतागायत सापडल्याची नोंद नाही आणि नैसर्गिकरीत्या ते शक्यही नाही. | आजही आपल्याला हे वाक्य नक्की ऐकायला मिळतं, "दोन्ही तोंडाने बोलू नकोस मांडूळा सारखं". आपल्या मनात दोन तोंडांचा साप म्हणजे 'मांडूळ' अशी एक धारणा काही गैरसमजुतीतून पसरली आहे. मांडूळ या सापाला एकच तोंड असतं.मात्र त्याची शेपूट | आखूड असल्याने हुबेहूब तोंडासारखी दिसते आणि यामुळेच आपण शेपटीलाही तोंड समजतो आणि दोन्ही बाजूस याला तोंड असल्याचा गैरसमज होतो.ह्या वरून आपणास लक्षात आले असेल कि मांडूळ सापाला एकच तोंड असतं. हे झालं मांडूळ सापाबद्दल. पण खरच दोन तोंडांचा साप



सागर सोनवणे
संपर्क 7757847104

असू शकतो का तर हो, दोन तोंडांचा साप असतो पण अश्या सापांना एकाच बाजूला दोन तोंडं असतात. हि सापाची वेळ जात नसून कोणत्याही सापाच्या प्रजातीमध्ये दोन तोंडं आढळू शकतात. काही अनुवंशिक बदलांमुळे असे साप जन्माला येतात. अशी उदाहरणे माणसांमध्ये सुद्धा आढळतात. अनुवांशिक बदलांमुळे जन्मलेला 2 तोंडी तस्कर साप दोन तोंडांचा साप. शरीर एक आणि तोंड दोन असल्यामुळे अश्या सापांचे दोन्ही मेंदू कार्यरत असतात आणि शिकार करताना, भक्ष खाताना, पाणी पिताना त्यांच्यात स्पर्धा लागते. या गोष्टी सतत घडत असल्याने त्यांच्यात वारंवार स्पर्धा लागून त्याच्यातच त्या सापाचा जीव जातो म्हणून असे साप निसर्गात जास्त दिवस जगू शकत नाहीत. नाग, घोणस, तस्कर, डुरक्या घोणस, कवड्या इत्यादी प्रजातीच्या सापांमध्ये दोन तोंडे असल्याचे अनेक उदाहरण भारतात किंबहुना महाराष्ट्रातही सापडल्याचे पहावयास मिळते.
सापांबद्दल काही रोचक तथ्ये साप थंड रक्ताचा प्राणी असून 8 डिग्री पेक्षा कमी व ४५ डिग्री पेक्षा जास्त तापमान सापांना सहन होत नाही.
साप अनेक दिवस अन्नाशिवाय राहू शकतात. भारतीय अजगर 2 वर्ष 9 महिने काहीही न खाता जागल्याची नोंद आहे. जगातील सर्वात विषारी साप बेल्चर समुद्र सर्प असून त्याचे विष ब्लॅक मांबापेक्षा विषारी आहे. मण्यार हा साप आशिया खंडातील सर्वात विषारी साप असून त्याचे विष नागाच्या विषाच्या कित्येक पटीने जहाल असते. हरणटोळ हा भारतातील एकमेव आडवी बाहुली असलेला साप आहे. सापाच्या शरीरामध्ये ७०% पाणी असते. सर्वात जास्त सर्पदंश सप्टेंबर महिन्यात होत असल्याचे आढळून आले आहे. कोलुब्रिडी हे सर्पजगतातील सर्वात मोठे कुळ असून जगातील ६०% सापांचा यामध्ये समावेश आहे. व्हायपरिडी कुळ हे सापाचे सर्वात विकसित कुळ आहे. सापाची दृष्टी कमजोर असून त्याला द्विमितीय प्रतिमा दिसते. पण हरणटोळ सापाचे डोळे इतर सापाच्या तुलनेत जास्त विकसित झाले असून उजवीकडे व डावीकडे असा डोलून समोर असलेल्या वस्तूची त्रिमितीय प्रतिमा तयार करतो. **क्रमश :**

# कवडसे सोनेरी ..अंतरीचे !



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**प्रसन्नचित्त करून टाकणारे लेखन -वाचण्यास मिळणे " वाचकांसाठी हा नक्कीच एक खूप वाचन-आनंद योग असतो .ललित लेखनात हे सामर्थ्य असते ", याची अनुभूती एक वाचक म्हणून मी अनुभवली . या ललित लेखसंग्रहाचे नाव आहे "कवडसे सोनेरी ..अंतरीचे ! लेखक-कवी -विश्वास देशपांडे त्यांचे हे पहिलेच पुस्तक . लेखकाविषयी अधिक सांगावेसे वाटते की - चाळीसगाव येथील - आ.बं. हायस्कूलचे ते मुख्याध्यापक होते . "आदर्श शिक्षक " पुरस्काराने सन्मानित विश्वास विष्णू देशपांडे - म्हणजे एक विद्यार्थीप्रिय शिक्षक " ही त्यांची खरी ओळख आहे . इंटरनेटवर म्हणजेच .. फेसबुक आणि त्यावरील विविध साहित्यिक समूह या सोशल माध्यमावर देशपांडेसर सात्याने लेखन करीत असतात .**

"प्रभातपुष्प ," "विचारप्रभात " संवादिनी " या त्यांच्या काही लोकप्रिय लेखमाला आहेत. वाचन, लेखन, प्रवास आणि संगीत " सरांचे आवडते छंद त्यांच्या या छंदास, आवडीस " अभ्यासपूर्ण ,चिंतनशील आणि काही चांगले सांगावे" अशी आंतरिक तळमळ असणाऱ्या त्यांच्यातील "हितचिंतक -शिक्षकाची साथ लाभली आहे. "या लेखनातून एक व्यासंगी जेष्ठ मार्गदर्शक संवाद साधतो आहे असे जाणवत राहते. देशपांडेसरांच्या या संग्रहाबद्दल म्हणावेसे वाटते की सगळीच भट्टी मस्तपैकी जमून आलेली आहे . १६७ पृष्ठांच्या या ललित लेख संग्रहात ५४ लेख आहेत "एका पेक्षा एक असे हे सरस लेख आहेत. या संग्रहास प्रस्तावना प्रा.प्रवीण दवणे यांची - जे स्वतःच एक उत्तम ललित लेखनकार आहेत, लेखक विश्वास देशपांडे यांच्या ललित लेखनाबद्दल लिहितांना त्यांनी जे विचार व्यक्त केले आहेत त्यातून ललित लेखन "या लेखन-प्रकाराबाद्दल माहिती होते. लेखक विश्वास देशपांडे यांच्या या साहित्यिक स्वरूप आणि त्यातील सौंदर्य उलगडुन सांगतांना - प्रा.दवणे सर म्हणतात.. "अंतरीचे हे सोनकवडसे ..एकाएकी प्रगट झालेले नाहीत. त्यामागे तीन तपांचे जीवनचिंतन आहे. अध्यापनाच्या व्यवसायाने दिलेले मनन आणि त्या आधी निरीक्षणाची शिदोरी आहे. जगण्या बद्दलचा सकारात्मक दृष्टीकोन व विश्वास हा ही विश्वास देशपांडे यांच्या प्रस्तुत लेखनाचा विशेष आहे. हे सोनेरी कवडसे जीवनातील शाश्वत मुल्यांकडे घेऊन जातात .

या लेखनाचा एक वाचक म्हणून मला काय वाटले -
तर मी म्हणेन की विश्वास देशपांडे सर - मी माझ्या शाळेत असतानंचे दिवस मला पुन्हा या पुस्तकाच्या निमित्ताने आठवले कारण एखाद्या दिवशी वर्गावर एखाद्या तासाला नियमित शिक्षक येऊ शकले नाही की तो तास साक्षात हेड-सर घेत असत आणि त्या तासात जे काही कानावर पडायचे ",ते कायमचे मनात साठवले जायचे", अग्दी तसेच मी हे लेख वाचत असतांना अनुभवले . लेखक - विश्वास देशपांडे हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होतेच "मुख्य म्हणजे हेड-सर होते ". या पुस्तकातील एकेक लेख म्हणजेच या हेड - सरांनी घेतलेला तास आहे ", आणि वाचक सहजपणे या सरांचा विद्यार्थी होऊन जातो. या लेखनात सहजता आहे, आत्मिक -जवळीक साधणारे हितगुज आहे, मोठ्या व्यक्तिमत्वाबद्दल व्यक्त होतांना आदरभाव कसा असावा याचे उदाहरण आहे. सामान्य व्यक्ती असो वा असामान्य व्यक्तिमत्व असो दोन्हीबद्दल अंतःकरणपूर्वक जपलेली कृतज्ञता आहे, जी व्यक्त करतांना या लेखनातून आदर्श -व्यक्तिमत्व साकारले गेले आहेत.. लेखक विश्वास देशपांडे ..स्वतःच्या लेखनाबद्दल म्हणतात - आशावादी आणि सकारात्मक विचात ठेवून जीवनाला आनंदाने सामोरे जायचे असते . माझ्या या सगळ्या लेखांमध्ये असाच प्रकारची सकारात्मकता ,आशावाद आपल्याला आढळेल . निराशेचा ,दुःखाचा स्वर आढळणार नाही.

सरांच्या या मनोगतातून एक स्पष्ट झाले आहे की.. जीवनात शोधायचा तो आनंद, यश, कार्यपूर्तीचा आनंद , स्वप्नपूर्तीचा आनंद, कठोर परिश्रमांना मिळालेले रसाळ फळ, हे सगळ वाट्याला




केव्हा येतं ? , त्याच्याच यशोगाथा म्हणता येतील असे अनेक लेख या संग्रहात आहेत. विषयाला अनुरूप असे शीर्षक ,आपल्या जवळच्या व्यक्तीविषयी सांगतांना जी आस्था असते , त्या आस्थेतूनच लेखक पूरक माहिती देतो , आणि त्या माहितीचा आपल्या मनावर सकरात्मक परिणाम होईल .असे चिंतनपर भाष्य करून लेखाचा शेवट करतो.. खरेच ..हे सर्व परिणामकारक असे लेखन आहे. साहित्य, संस्कृती, लोककला, संगीत , समाजिक पर्यावरण , व्यक्ती-विशेष. यात सर्व क्षेत्रातील अलौकिक, असामन्य , थोर ,कीर्तिवंत आणि लोकप्रिय व्यक्तींबद्दल असे लेख आहेत.. ही अशी विविधता म्हणजे लेखकाच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवणारे आहे. हे पुस्तक नक्कीच वाचावे असे आहे म्हणून या ठिकाणी मला आवडलेल्या काही लेखांची शीर्षके मी आपल्याला सांगतो.. स्वप्न साकारले " (पृ..१६ ), "सोशल मिडीया : एक दुधारी शस्त्र (पृ.२५ ), एक अवलिया गायक - किशोर कुमार (पृ..४१ ) , " लाईफ इज ब्युटीफुल (पृ..४६ ), "विंदा : कवीमनाचा माणूस (पृ,५२ ), , "एक दुजे के लिये - (पृ.६४ ),
"बापमाणूस - (पृ,७६ ), " रहस्य गीतारहस्यच - (पृ,८२ ), "मन प्रसन्न करणारी गाणी ..(पृ.९० ), " आपल्या मुलांचे पालक व्हा ..मालक नको (पृ. १०२ ), गदिमा आणि गीतरामायण ", (पृ..१०६ ), तरुणांनी ज्ञानेश्वरी का वाचावी ? (पृ.१३४ ), गानसरस्वती "(पृ..१४८ ), गानसम्राज्ञी (पृ..१५८ ). विश्वास देशपांडे सर, तुमच्या या लेखनाने खूप आनंद दिला. कवडसे सोनेरी ..अंतरीचे !, संग्रहाचे सुरेख मुखपृष्ठ करणाऱ्या कलावंत चैताली नाचणेकर यांच्या कामगिरीचे खूप खूप कौतुक . पुण्याच्या विश्वकर्मा पब्लिकेशन यांनी या पुस्तकाचे प्रकाशन २०१८ साली केले आहे.

पुस्तक-परिचय लेख-
**ले- अरुण वि.देशपांडे -पुणे.**
**संपर्क - ९८५०१७७३४२ =**
**ललित लेख संग्रह -**
**कवडसे सोनेरी ..अंतरीचे ! -**
**पृ -१६७ , मूल्य-रु.२२५ /-**
**ले- विश्वास देशपांडे**
**संपर्क - 9373711718**
**प्रकाशक - विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे.**
**संपर्क - ९१६८६८२२००**

# मुले म्हणजे यंत्रे नव्हेत

आधुनिक केसरी

प्रत्येक मुलाला जन्मतःच काही नैसर्गिक क्षमता मिळालेल्या असतात.त्या विकसित होण्यासाठी पूरक वातावरण तयार करणे हे पालक आणि शिक्षकांचे काम असते. मुलांना प्रेरित केल्याने मुलांच्या अंगी असलेली कौशल्ये विकसित होतात.कोणत्याही उपक्रमात ,स्पर्धेत भाग घेताना मनापासून तयारी करावी.प्रयत्न करुन सहभागी झाल्याचा आनंद मानावा.यश मिळाले तर आनंद जरुर मानावा पण अपयश आले म्हणून निराश होऊ नये. आजचे युग प्रचंड अशा जीवघेण्या स्पर्धेचे आहे. त्यात आपला पाल्य



टिकला पाहिजे अशी पालकांची इच्छा असते. यासाठी स्पर्धेत उतरवून त्याला पळवले जाते. कधी त्याची इच्छा असते किंवा नसते. पण स्पर्धेत उतरावे लागते. यावेळी त्याच्या अंगभूत क्षमता आणि कौशल्ये पाहिली पाहिजेत. परंतु पालक याकडे दुर्लक्ष करतात. समाजात माझे कौतुक झाले पाहिजे.मला सतत कुणी तरी चांगले म्हटले पाहिजे. आपली इच्छा, आकांक्षा मुलांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादले जाते. दुसऱ्याशी तुलना केली जाते. पाल्य मागे पडतोय काय ? अशी भीती पालकांच्या मनाला सतावत राहते.त्यातून मुलांवर प्रचंड ताण येतो. कधीकधी पूर्ण क्षमता किंवा कौशल्य वापरुन अपयश आल्यावर मुलांना व पालकांना ते पचविणे जड जाते.याचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

मुलांना प्रोत्साहन द्यावे.पण त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादू नये.एखाद्या उपक्रमात, स्पर्धेत त्याला निकोप आणि मुक्तपणे भाग घेऊ द्यावा.यश अपयश हा नंतरचा भाग असतो. वयाच्या त्या -त्या टप्प्यावर मुले सरावाने आणि प्रयत्नाने कौशल्ये प्राप्त करुन पुढे जात असतात. प्रत्येक मूल हे वेगळे असल्याने प्रत्येकाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे एकमेकांची तुलना करणे गैर ठरते. तसेच मुलांकडून अवास्तव अपेक्षा ठेवण्याचा विचारही चुकीचा असतो. खरं तर त्यांच्या भाव भावना समजून घेणे आणि त्यांना विश्वास देणे गरजेचे असते. मुलांच्या अंगी असणाऱ्या कौशल्यांना प्रेरणा देणे हे खूप महत्त्वाचे असते.त्यामुळे मुलांना चैतन्य आणि ऊर्जा मिळते.त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.

**-लक्ष्मण जगताप**
लेखक शिक्षक आहेत

# मार्गदर्शक सारथी



श्री सागर ननावरे
(लेखक 'मनाचा अँटीव्हायरस' बेस्ट सेलर बुक)

आधुनिक केसरी

**एका खेड्यातील एका वृध्द माणसाचा एक तबेला होता. त्यात एकोणीस घोडे होते. एके दिवशी ती वृध्द व्यक्ती मरण पावली. मृत्युपूर्वी त्या व्यक्तीने स्वतःचे मृत्युपत्र लिहून ठेवलेले होते. मृत्यूनंतर गावच्या पंचायतीसमोर ते मृत्यूपत्र वाचण्यात आले. ज्यामध्ये जमिनीचे आणि संपत्तीचे समान वाटप केले होते. त्यात त्याच्याकडे असणाऱ्या घोड्यांचेदेखील वाटप लिहिले होते. त्यात त्याने लिहिले होते की, माझ्या १९ घोड्यांपैकी अर्धे माझ्या मुलाला, एक चतुर्थांश माझ्या मुलीला आणि एक पंचमांश माझ्या नोकराला द्या.**



या अजब वाटणीने सगळ्यांच्या मनात गोंधळ उडाला. नेमके हे वाप कसे करायचे हा प्रश्न उभा राहिला. कारण एकोणीस घोडे होते. आणि एकोणीस ही संख्याच विषम असल्याने त्यातील अर्धा घोडा वाटणार कसा.
त्या गावातील सरपंच म्हणाला, आपण एक घोडा मारून टाकू आणि उरलेले अठरा = वाटप करू. परंतु या उत्तरातून कोणाचेही समाधान होईना. सर्वच लोक खूप गोंधळले होते. अशावेळी शेजारच्या गावातील एका अनुभवी तबेला मालकाला बोलविण्यात आले. तो तबेल्याचा मालक त्याच्या स्वतःच्या घोड्यावर स्वार होऊन गावात आला. त्याने शांतपणे समस्या ऐकून घेतली. त्यावर शांत चित्ताने थोडा विचार केला. आणि मग हसतमुख चेहऱ्याने म्हणाला, याचं उत्तर मला सापडलं . या १९ घोड्यांमध्ये माझा घोडा देखील वाटून टाका. गावातील लोकांना त्याचा हा निर्णय मूर्खपणाचा वाटला. लोक चर्चा करू लागले एक मरणासन्न वेडा वृध्द होता, जो असे अजब वाटणीचे मृत्युपत्र करून निघून गेला. आणि आता हा दुसरा वेडा आला आहे जो म्हणतो की माझाही घोडा यात समाविष्ट करा. परंतु तरीही हे मान्य करण्यात काय नुकसान आहे, असा विचार सर्वांनी केला. आता एकूण वीस घोडे झाले. वाटप सुरु करण्यात आले. मृत्युपत्राप्रमाणे वीस पैकी दहा घोडे मुलाला, एक चतुर्थांश म्हणजेच पाच मुलीला आणि एक पंचमांश म्हणजेच चार नोकराला देण्यात आले. एक उंट उरला तो त्या विद्वान तबेला मालकाचा होता. त्याने तो ताब्यात घेतला आणि त्याच्या गावी निघून गेला. सर्वांनीच त्याच्या वाटपाचे कौतुक केले. आता ही गोष्ट इथेच संपली . परंतु यातून बोध काय बरं घ्यायचा ? शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ? अनुभवी व्यक्तींचा सल्ला घ्यावा ? की आणखी काही ...? आपल्या सर्वांच्या आयुष्यातही असे एकोणीस घोडे आहेत. पाच ज्ञानेंद्रिये - डोळे, नाक, जीभ, कान, त्वचा. पाच कर्मेंद्रिये - हात, पाय, जीभ, लिंग, गुद्द्वार. पाच वायुतत्वे - प्राण, अपान, सामना, व्यान, उडान
चार विवेक (अंतकरण चातुष्ट)- मन, बुद्धी, मन, अहंकार. असे एकूण एकोणीस घोडे आहेत. आयुष्यभर माणूस या 19 घोड्यांच्या वाटणीत अडकून राहतो. परंतु जोपर्यंत त्यात एक मार्गदर्शकरुपी घोडा त्यात मिसळत नाही तोपर्यंत त्याला अनेक गोष्टी साध्य होत नाहीत. हा विसावा घोडा नव्हे तर तो आपला सारथी म्हणायला हवा. जो आपल्याला तत्वज्ञ ,मार्गदर्शक,गुरु, सद्गुरू, दिशादर्शक किंवा हितचिंतक म्हणून भेटत असतो. आपल्या आयुष्यात यांचे स्थान अत्यंत मोलाचे असते. हे सारथी आपल्या मनात ध्येयाची उत्कट इच्छा निर्माण करतात. जेव्हा आपण ध्येयापासून विचलित होतो तेव्हा ते आपल्याला योग्य मार्गदर्शन करतात. आलेल्या प्रत्येक संकटावर जिद्दीने मात करण्याची प्रेरणा देतात. आपल्यात सळसळता आत्मविश्वास निर्माण करतात. आपल्या जीवनाला एक योग्य दिशा देतात. त्यामुळे अशा लोकांचे महत्व आपल्याला समजायला हवे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनात मार्गदर्शकाला खूप महत्व आहे. जर मार्गदर्शन देणारे कोणी नसेल तर माणूस भरटकतो. त्याला योग्य काय अयोग्य काय हे कळत नाही. जर माणूस विवेकी असेल तर अनुभवातून तो शिकेल कदाचित पण आयुष्यात कुठे न कुठे गुरु लागतोच.
राजमाता जिजाऊंच्या उपदेशाने शिवराय घडले आणि स्वराज्य साकार केलं. महाभारतात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथी बनले आणि इतिहास घडला. ज्या एकलव्याला गुरूंनी नाकारले त्याने त्यांच्या पुतळ्यातून मार्गदर्शन घेत धनुर्विद्येत प्राविण्य मिळविले. थोडक्यात काय तर आयुष्यात भव्यदिव्य यश मिळविणाऱ्या , प्रसिद्धी प्राप्त करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमत्वामागे एक मार्गदर्शक सारथी आहेच. गुरूने, मार्गदर्शकाने दाखविलेल्या मार्गावरून चालण्यानेच या व्यक्ती मोठ्या झाल्या. त्यामुळे आपल्याकडे हक्काचे हजारो साथी असूद्यात पण आयुष्याला दिशा देणारे बोटावर मोजण्याइतके तरी सारथी हवेच. हल्ली तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी ते घडविण्यात मानवी हातच आहेत हे विसरून चालणार नाही. दैनंदिन प्रवासासाठी गुगल मॅप मदत करेल परंतु आयुष्याच्या यशस्वी आणि सुकर प्रवासासाठी मार्गदर्शक हवाच.

# अम्मी अब्बूच्या कविता: हृदयस्पर्शी काव्य !

आधुनिक केसरी

**आईच्या बाबतीत जेवढं साहित्य वाचायला मिळते त्या तुलनेत वडिलांच्या विषयी फार कमी प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. त्यातच आईवडील यांना समोर ठेवून एकत्रितपणे साहित्य निर्मिती म्हणावी त्याप्रमाणे झाली नाही. हे लक्षात येण्याचे कारण म्हणजे श्री जावेद शेख यांचा 'अम्मी अब्बूच्या कविता' हा संग्रह नुकताच वाचण्यात आला. चपराक प्रकाशन पुणे यांनी अत्यंत आकर्षक स्वरुपात हा संग्रह वाचकांपर्यंत पोहोचवला आहे. एकीकडे पुस्तके कुणी वाचत नाहीत त्यातही कविता संग्रह कुणी विकत घेत नाहीत अशी चर्चा कायम सुरु असताना चपराक प्रकाशन सातत्याने एकानंतर एक विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित करीत आहेत ही अत्यंत समाधानाची बाब आहे.**

या कविता संग्रहाचे मुखपृष्ठ संग्रहाच्या शीर्षकाशी आणि कवितांशी नाते जोडणारे आहे कारण यातील साऱ्या कविता ह्या कविच्या अम्मी अब्बाची ससेहोलपट सांगणाऱ्या, एकूणच त्यांचा खडतर जीवन प्रवास मांडणाऱ्या आहेत. त्यामुळे लेखक आणि प्रकाशक यांची समयसूचकता यासाठी वाखाणण्याजोगी आहे की, मुखपृष्ठावर कविच्या अम्मीअब्बाचे छायाचित्र अत्यंत बोलक्या स्वरुपात चितारले आहे. त्यासाठी चित्रकार राहूल पगारे हे अभिनंदनास पात्र आहेत. तसेच आतील कवितांशी निगडित अशी रेखाचित्रे प्रवीण उगले यांनी उत्तम प्रकारे रेखाटली आहेत. राजेश कदम यांची अंतर्गत मांडणी असेल, कागद असेल, छपाई असेल, अक्षरांचा आकार असेल हे सारे अत्यंत उत्कृष्टपणे जुळून आले आहे. त्यामुळे बाह्यांगाविषयी जास्त सांगण्याची गरज नाही. कविने 'माय-बापाला' ही अक्षरफुले अर्पण करुन एक मस्त योग साधला आहे. एकूण ३७ कविता असणाऱ्या या काव्यसंग्रहाला विवेक उगलमुगले यांची खूप छान प्रस्तावना लाभली आहे. कविच्या मनोगतातून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे कविचे कुटुंब अत्यंत हलाखीची, गरिबीची परिस्थिती जगले आहे कारण कवी मनोगतात लिहितात ते शाळेत असताना रेल्वे स्थानकावर खाद्यपदार्थांची विक्री करणे, भाजी बाजारात भाज्या विकणे अशी कामे करत करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. या प्रवासात जशी चांगली माणसे भेटली तशीच काही वाईट प्रवृत्तीचीही माणसे भेटली. समाजात असे होत असते परंतु आपण कुणाकडून काय घ्यावे, कुणाची संगत आपल्यासाठी उपयुक्त आहे हे आपणास ठरवता आले पाहिजे. त्यासाठी सर्वोत्तम संस्काराची अत्यंत आवश्यकता असते. असे संस्कार कविवर त्यांच्या अम्मीअब्बाकडून झाले असे कवी विनयाने नमूद करतात. कविला कुठलाही साहित्यिक वारसा नाही परंतु कवी म्हणतो तो कवितांची सुरुवात अम्मीच्या गर्भधारणेपासून करतो. त्या अवस्थेत अम्मीच्या वाट्याला येणारी सारी दुःख जशी माऊली भोगत होती तशीच ती दुःखे घेऊन अर्भकही वाढत होते. याच परिस्थितीत कदाचित कविचा जन्म झाला असावा कारण कवी असेही म्हणतात की, मुलाचा जन्म होताच विठाई नावाच्या दाईनीने नाळ कापल्यामुळे माझी तडफड सुरु झाली आणि तत्क्षणी अम्मीनं पदराआड धरलं. एकप्रकारे तिने नाळ पुन्हा जोडली ती अम्मीच्या वेदनांशी आणि कवितेशी. कवी म्हणतात,

***तेव्हापासून आई कविता होतेय***
***आणि प्रत्येक कविता आई***

कवितेला आईच्या रुपात पाहणे किंवा कवितेला आई मानने यातून कविची आईशी नि कवितेशी नाळ किती घट्ट जोडल्या गेलीय हे लक्षात येते कारण साहित्य क्षेत्रात असा एक मत प्रवाह आढळतो की, प्रत्येक साहित्य रचना हे त्या त्या लेखकाचे अपत्य असते परंतु या कविचा अंदाज निराला है। कवी म्हणतात नाळ वेगळी झाल्यानंतरही आईने केवळ स्वतःच्या पान्ह्याशीश नाहीतर स्वतःच्या दुःखाशी जोडून घेतले. अम्मी अंगाई गीत गात असे परंतु त्या गीतातूनही बाळाला तिच्या वेदना जाणवत होत्या.

रोजमजुरी करणारे कविचे अब्बा सायंकाळी थकूनभागून घरी आल्यावर अब्बूची वाट पाहणाऱ्या लेकरांना जवळ घ्यायचे. काम करुन करुन घट्टे पडलेल्या हातांनी चिमणीच्या प्रकाशात भिंतीवर वेगवेगळ्या प्राण्यांच्या आकृत्या काढत खेळवायचे ते सारे पाहताना बालकांना खूप आनंद होत असे. हे सांगताना कविला मात्र एका गोष्टीची सल निश्चितच आहे. कवी म्हणतो आज आम्हा भावंडांना रिमोटवर आणि भ्रमणध्वनीवर बोटे फिरवताना पाहून अब्बू अस्वस्थ होतो. कुठेतरी हरवल्याप्रमाणे तो आमच्या शेजारी बसून त्या न येणाऱ्या प्राण्यांना बोलवत राहतो. किती जळजळीत आणि भयाण वर्णन आहे हे. बहुतांश घरी हे वास्तव आपणच कवटाळत आहोत. समाज माध्यमांच्या चक्रव्यूहात आपण एवढे गरगरत आहोत की, हाडे झिजविणाऱ्या, घामाच्या स्वरूपात रक्त वाहवणाऱ्या आईबाबांना बोलायलाही आपल्याला वेळ नसतो, त्यांच्यापेक्षा भ्रमणध्वनी जवळचा झाला आहे.

कवी एकेठिकाणी म्हणतात, पूर्वी म्हणजे लहानपणी कवी अम्मीच्या कुशीत झोपताना अल्लाचे नाव घेऊन झोपत असे. परंतु काळ बदलला. कवी आजही निवांत गाढ झोपी जाताना कलमे म्हणतो... अम्मीचे! किती मातृभक्ती आहे ना ही. काही दिवसांनी अम्मीच्या पोटी अजून एक बाळ आले. कुटुंबाचा त्यातही अब्बाचा आनंद गगनात मावत नव्हता. भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला अब्बा पेढा देत होता. पेढा वाटणे याचा अर्थ मुलगा झाला असाच होतो. पेढा देताना अब्बू म्हणतात,

***अल्लाकी नियामत हुवी है***
***घरमें बरकत आयी है...***
***गरीब के घरमें राजदुलारी हुवी है...***

दोन भावंडांच्या पाठीवर झालेल्या मुलीचा असा आनंद साजरा करणारा बाप विरळाच! मुलापेक्षा मुलगी जास्त समजूतदार असते असे म्हणतात. कारण कविचे मम्मी-आब्बू कामाला गेले की, लहान असूनही भावंडांची काळजी जिला सारे माई म्हणत ती घेत असे. प्रेमाने भरलेल्या काळजाने माई घर सांभाळत असे. लहान मुले म्हटले की, भांडणं, रुसवेफुगवे हे ठरलेलेच. दोघा भावांत भांडणे झाली की, वयाने लहान असणारी परंतु जबाबदारीने मोठी झालेली माई भावांची भांडणे मिटवत असे. त्यावेळी ती त्यांची आई असल्याप्रमाणे समजूत काढत असे. त्याबद्दल कवी लिहितात...

***अबोला धरणारी माई***
***होऊन जायची आमची आई.***
***मिटवायची आम्हा भावंडांची भांडणं***
***दूर करायची रुसवे फुगवे***
***सोडवायची वाद-विवादाचा***
***गुंता समजूतदारपणानं!***

मुलगी कितीही हुशार, समजूतदार, कष्टाळू, सर्वांना घेऊन जाणारी असली तरीही ती बापाच्या घरी एक पाहुणीच असते हे कटुसत्य असले तरीही वास्तव आहे. योग्य वेळी तिला सासरी पाठवावे लागते. अश्रूंची शिदोरी देऊन बोळवावे लागते. कवी माईच्या पाठवणीचा प्रसंग जणू आसवांची शाई करून लिहितात...

***तेव्हा पहिल्यांदाच डोंगरासारखा***
***खंबीर मनाचा अब्बू लहान मुलासारखा***
***हसमून हमसून रडला होता***
***माझा अब्बू तेव्हा***

मला कर्णापेक्षाही श्रेष्ठ वाटला होता...

कर्ण! दानशूर कर्णाचा कुणी उत्तराधिकारी असेल तर खरोखरीच मुलीचा पिता! जन्मल्यापासून वर्षानुवर्षे एखाद्या फुलाप्रमाणे जपलेल्या मुलीचा हात त्रयस्थाच्या हाती देणारे आईबाप खरेच धन्य आहेत, दानशूर या पदवीपेक्षाही श्रेष्ठ आहेत. मुलीला सासरी पाठवताना आई भरपूर रडत असते, बाप मात्र स्वतःचे अश्रू आतच दाबत हसतहसत मुलीला निरोप देत असतो. अनावर होऊ घातलेल्या भावना आतच न दाबता आल्याने कविचा अब्बू 'हमसून हमसून रडला होता...'

व्यसन! आपल्या आरोग्यासाठी अत्यंत घातक अशी गोष्ट! त्यात मुलांसमोर एखाद्या व्यसनाला कवटाळणे हे तर महाभयंकर! कविच्या अब्बूलाही बिडीचे व्यसन होते. मुलं लहान असताना अब्बूच्या या व्यसनाचे मुलांना अप्रूप वाटत असे. अब्बू बिडी ओढताना नाकातून धूर काढायचा, धूराचे गोलगोल रिंगण अवकाशात सोडताना मुलांना खूप गमतीचे वाटत असे. ती क्रिया पुन्हा पुन्हा करावी असा हट्ट मुले अब्बू जवळ धरायचे. परंतु मुले मोठी होत गेली. वयानुसार अब्बूलाही बिडीचा त्रास होऊ लागला. कवी म्हणतात,

वारंवार खोकल्याच्या येणाऱ्या उबळीने
अब्बूपेक्षा घरच बेजार होत जाते.
लहानपणी ज्या मुलांना बिडी
पिण्याचे आणि
त्यातून




निघणाऱ्या
धूराची गंमत वाटत असे
तोच अब्बू, त्याची तीच बिडी नि तोच धूर
शिक्षित मुलांना आवडत नाही. त्यावरून वाद होऊ लागतात. चूक कुणाची, बरोबर कुणाचे हेही ठरवणे अवघड जाते.

कावळ्याच स्पर्श हा नेहमीचाच चर्चेचा नि मता- मतांतरांचा प्रश्न. प्रत्येक स्त्रीला या अग्निदिव्यातून जावेच लागते. माईवरही जेव्हा ही वेळ येते. तेव्हा तिची प्रथम ती तशी अवस्था पाहून माईच्या भावांची अवस्था बिकट होते. आपली माई आपल्याशी का बोलत नाही. त्रस्त झालेला भाऊ बहिणीच्या काळजीने अम्मीला विचारतो तेव्हा अम्मी सांगते, तिला कावळा शिवला आहे. या उत्तराने भावांचे समाधान होत नाही परंतु माईच्या आजच्या अवस्थेला कावळा जबाबदार आहे एवढेच लक्षात घेऊन अंगणातल्या आंब्याच्या, उंबराच्या झाडावर बसलेल्या कावळ्याच्या दिशेने रागारागाने दगडं भिरकावून काही प्रमाणात राग शांत करून घेत असे. परंतु कालांतराने 'कावळा शिवणे' ही बाब शैक्षणिक जीवनात वैज्ञानिक दृष्टीने समजते आणि तेव्हा स्त्रीचे महानत्व आणि तिचे कष्टमय जीवन लक्षात येताच कवी म्हणतो,

***मुली आणि बाईच्या जातीला कधीतरी***
***स्पर्शणारा कावळा दाणे टिपायला येईल***
***अंगणात त्याच्या काळ्या पंखांची सावली***
***या माझ्या पुरुषी देहालाही***
***स्पर्शून जाईल आणि मलाही***
***देऊन जाईल पवित्र आईपण...***

किती उत्कट आणि हृदयस्पर्शी भावना आणि कवीचे हळूवार मन आहे ना..

प्रिय अबूबद्दलच्या भावनाही कवी अत्यंत भावस्पर्शी शब्दांत व्यक्त करतो...

***घरात घुसल्याबरोबर मारतो घट्ट मिठी***
***माझ्या देवमाणसाला, साक्षात ईश्वर-***
***अल्लाला थकलेल्या शरीराच्या***
***माझ्या प्रिय प्रिय अब्बूला...***

यातून वडिलांमध्ये प्रत्यक्ष ईश्वर- अल्लाला पाहणाऱ्या, आदरभाव व्यक्त करणाऱ्या जावेद शेख यांच्या विनम्रतेची साक्ष पटते.

शिवजयंतीच्या निमित्ताने शाळेत होणाऱ्या कार्यक्रमात जावेद शेख नावाचा विद्यार्थी विचार मांडणार हे समजताच एक वेगळीच चर्चा सुरू होते. 'एक मुसलमान आणि शिवरायांचे गुणगान' हा विषय औत्सुक्यापेक्षाही कुशंका उत्पन्न करणारा होतो. त्यामुळे शेख जावेद यांच्या मनातही काही प्रमाणात भीती, अस्वस्थता निर्माण होते. ही सारी भीती जावेद अब्बूच्या कानावर घालतात तेव्हा अब्बू म्हणतात, 'बाळा, जे करशील ते सच्च्या मनाने कर. खुदाशिवाय कुणालाही भ्यायची गरज नाही. तुझा अब्बू तुझ्यासोबत आहे. जा. जोरदार भाषण दे...' अब्बूच्या अशा भक्कम पाठिंब्यामुळे जावेदला हजार हत्तीचे बळ आले नि तेव्हापासून सुरू झाला कविचा शिव आख्यानाचा प्रवास...

आपला मुलगा सुसंस्कृत व्हावा, तो चांगला शिकावा असेच सर्व पालकांना वाटते. त्यामुळे ते पाल्यांवर योग्य संस्कार करण्याचा प्रयत्न करतात. जावेद यांचे वडीलही मुलांवर सुसंस्कार व्हावेत यासाठी प्रयत्नशील असायचे. एकदा जावेद दुपारची शाळा चुकवून मित्रांसोबत खेळायला गेला. ही गोष्ट अम्मीला समजताच ती अब्बूच्या कानावर गेली. ते ऐकून अब्बूच्या रागाचा पारा चढला. त्यांनी संतापाने जावेदला विचारताच 'शाळेला दुपारी सुट्टी होती...' असे सांगत असतानाच अब्बूने जावेदच्या कानाखाली आवाज काढला आणि म्हणाला,

***स्कूल को दांडी मारा तो भी***
***एक बार माफ करता था पर झूठा बोलता***
***वो भी मुह उपर करके...?***

त्यानंतर जावेदनी आयुष्यात कधी शाळा बुडवली नाही. मेणाहून असणारा बाप प्रसंगी वज्राहून कठीण झाला तर मुलांचे आयुष्य घडायला फार मोठी मदत होते. मात्र पाल्यांचा बाबतीत कठोर असणारे पालक जेव्हा पाल्याच्या भविष्यासाठी गमतीने का होईना खोटे बोलतात तेव्हा कवी लिहितो...

***कितीतरी प्रसंगात मी टिपला आहे***
***अब्बाचा खोटारडेपणा.***

तेव्हा कविला अब्बूचा राग येत नाही तर कृश शरीर असलेल्या, फाटक्या कपड्यातील खोटारडा अब्बू कुबेर, हिमालय आणि महासागरापेक्षाही जगातील सर्वश्रेष्ठ देवदूत भासतो.

आईची ममता काही वेगळीच असते. तिच्या प्रेमाला, लाडाला काही अंत नसतो. परंतु त्याचसोबत ती आपल्या मुलांबद्दल सर्वत्र चांगले बोलले जावे, त्याने कौतुक होईल असेच वागावे. कुठे अपमान होईल, मुलाच्या वागणूकीमुळे, छोट्या चुकीमुळे त्याची आणि सोबतच कुटुंबाची मान खाली जाईल असे मुलाने वागू नये अशीच तिची मुलांना शिकवण असते. जावेद यांच्या अम्मीचीही अशीच अपेक्षा होती. परंतु एकदा गल्लीतील एका घरी जावेद अम्मीसह जातो. त्या घरातील मुलगी जेवत असल्याचे पाहून जावेदची भूक डोके वर काढते. तो तळमळू लागतो. त्याची अवस्था पाहून अम्मी त्याला डोळ्याने शांत राहायला सांगते परंतु जावेद त्या मुलीकडून चतकोर पोळी मागून घेतो परंतु त्यामुळे अम्मीचा स्वाभिमान दुखावतो. घरी आल्याबरोबर अम्मीचा हात कविच्या कानाखाली विसावतो. एकदा अब्बूची एक गोष्ट न आवडल्याने जावेद त्यांना काही तरी बोलतो ते अपमानास्पद शब्द ऐकून अम्मीच्या रागाचा पारा चढतो आणि ती पोळ्या लाटणाऱ्या हातातील लाटणे फेकून मारते. त्या प्रसंगाचे वर्णन करताना कवी शेख लिहितात,

***तेव्हा, मी चुकवला होता***
***शिताफीनं लाटण्याचा वार***
***पण अम्मीच्या संस्काराचा बाण***
***थेट आरपार कोवळ्या काळजात***
***खोल रुतत गेला***

संस्काराचा बाण! व्वा! मान गए। असे अनेक शब्द हा काव्य संग्रह वाचताना वाचायला मिळतात. यातून कविचे खास वैशिष्ट्य आणि शब्दसंपत्ती जाणवते.

आपली मुलगी परक्याच्या घरी जाते हा दुरावा बऱ्याच प्रमाणात सून घरी आली की दूर होतो. जावेद यांच्या मोठ्या भावाचे लग्न होते नि घरात सून येते. नवीन मुलगी घरात आली की तिच्या प्रत्येक बाबीची उत्सुकता सर्वांना असते. विशेषतः स्वयंपाक! पहिल्या बहुचा पहिला स्वयंपाक! सारे उत्साहाने जेवायला बसतात. काही न बोलता सारे जेवत असताना अचानक अब्बू म्हणाले,'क्या बात है, मस्त तर्रिदार हुवा है सालना, चावल भी एकदम मोकले हुवे है...' हे वाक्य ऐकताना जेवणारांचे हात थबकले, घास अडकले. काय झाले होते असे की, पडद्याआड स्वयंपाक घरात असणाऱ्या नि कान बाहेर असणाऱ्या बायकोला नवऱ्याने नजरेनेच सारे काही सांगितले. त्यामुळे सूनेला वाईट वाटते. त्याचवेळी अम्मीने बहुला केलेले मार्गदर्शन बहुमोल असेच. कवी नाराज झाला, उदास झाला की, अम्मी त्याला समजावते, त्याच्यातील कवित्वाला एका अर्थाने जागे करताना म्हणते, बाळा, जे मनातली भावना पटकन बोलून मोकळे व्हावे. मनात ठेवल्याने मन जखमी होते. परंतु ते सगळ्यांना सांगितले तर त्या शब्दांतून गीत जन्म घेते...

***तू तो दो चार किताबे पढेला***
***दिल के दर्दको चुमटीमे ले***
***उसे कागजपर उतारकर गुलशन कर दे...***

कवी जावेद शेख यांच्या कलमेतून ज्या मनस्पर्शी कवितांनी जन्म घेतला आहे त्याचा वारसा हा वरील शब्दांत आहे.

कवितासंग्रह वाचनीय आहे. पालक नि पाल्य यांना अनेक बाबतीत मार्गदर्शन करणारा आहे. कवितांमध्ये आणि कविची अनुभवाची शिदोरी आणि शब्दांचा आवाका पाहता या संग्रहात निश्चितपणे महाकाव्य दडलेले असल्याचे जाणवते. कविची भाषा आणि शैली चार चौघात वापरली जाणारी मोकळी ढाकळी आहे त्यामुळे ती जवळची वाटते. महत्त्वाचे म्हणजे कविता इतक्या सहजतेने लिहिल्या आहेत की, त्यात कृत्रिमता शोधूनही सापडणार नाही. कविला कवित्वाची बाधा, बडेजाव कुठेही आढळत नाही. त्यामुळेच कविता आणि कवी जवळचे वाटतात. एक आगळेवेगळे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशक घनश्याम पाटील यांचे अभिनंदन!

**अम्मी अब्बूच्या कविता: कवितासंग्रह**
**कवी: जावेद शेख**
**प्रकाशक: घनश्याम पाटील**
**चपराक प्रकाशन, पुणे**
**पृष्ठसंख्या: ११२**
**किंमत: १३०/-**
**आस्वादक: नागेश शेवाळकर,**
**पुणे ९४२३१३९०७१)**

# जीवाच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे गरजेचे!

आधुनिक केसरी

दिवसेंदिवस रस्ते अपघाताच्या घटना घडत आहेत.रस्ते सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अपघातात होणारी जिवीतहानी रोखण्याची गरज निर्माण झाली आहे.सुरक्षित प्रवास , सुरक्षित पोहचणे, सुरक्षित राहणे, हि प्रत्येकाची जबाबदारी आहे. जसा वेळ अमुल्य आहे. तसेच आपले जीवन देखील अमुल्य आहे .

सरकार एकीकडे वाहतुक नियमांचे कायदे नियम करत आहे . परंतू नागरीक त्याची प्रभावी अंमलबजावणी करत नाही . प्रत्येकाने स्वंयशिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे.बरेचसे अपघात नियमांचे पालन न केल्यामुळे होतात.नियमांकडे होणार्या दुर्लक्षामुळे अपघातास कारणीभूत आहेत.लोकांचे जीवन वाचविण्यासाठी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. सरकारने हेल्मेट सक्ती केली तरी लोकांना त्याचा राग येतो. सरकार आपल्या भल्यासाठीच सकारात्मक गोष्टी करत असते. प्रसंगी लोक दंड भरायला देखिल तयार होतात. परंतू हेल्मेट वापरत नाही.ही शोकांतिका आहे. सर्वोच्च न्यायालयाने हेल्मेट सक्ती असावी असा निर्णय दिलेला आहे. मात्र ही सक्ती जबरदस्ती नाही. परंतू लोकांनीच आता हे सत्य स्विकारायला हवे.आपला जीव डोकं महत्वाचे आहे. त्यासाठी तरी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट वापरणे गरजेचे आहे.परंतू बरेच वाहनचालक राज्यात वाहतुक नियम मोडतात. एकीकडे दुचाकीस्वारांची संख्या वाढत आहे. तर दुसरीकडे दुचाकीस्वारांचे



अपघाताचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्र हा अपघाताच्या संख्येत तिसऱ्या क्रमांकावर आहे.ग्रामीणभागातही दुचाकीस्वारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.अपघाताचे प्रमाण कमी करायचे असेल तर हेल्मेट वापरणे गरजेचे आहे.हेल्मेट न वापरता होणारा प्रवास जिवावर बेतु शकतो. विनाहेल्मेट प्रवास करणे अनेकांच्या जीवावर बेतत आहे. हेल्मेट विषयी लोकांच्या मनात गैरसमज आहेत. ते आधी दुर केले पाहिजेत. हेल्मेट घातले की टक्कल पडते,केस गळतात हा गैरसमज आहे.चांगल्या प्रतीचे हेल्मेट वापरणे गरजेचे आहे.हेल्मेटमुळे आपण आपले डोके वाचवू शकतो.हेल्मेट ज्या व्यक्तीने घातले आहे त्याला अपघातात तुलनेने कमी दुखापत होते.मेंदुला गंभीर इजा होत नाही. त्यासाठी हेल्मेट घालण्यासाठी स्वताःहुन पुढाकार घेऊन हेल्मेट वापराविषयी सकारात्मक प्रतिसाद द्यायला हवा.

बहुतांश अपघात डोक्यास गंभीर इजा झाल्याने मृत्यू होत असून त्याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे.बरेचसे दुचाकीस्वार हेल्मेट वापरत नाही.वाहनचालकांनी स्वताःच्या सुरक्षेसह वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.विना हेल्मेट वापरणार्या दुचाकीस्वारांना दंड करण्याची तरतूद कायद्यात आहे.आज लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होण्याची आवश्यकता आहे.त्यासाठी लोकांचे जीव वाचवण्यासाठी हेल्मेट वापरणे अत्यंत गरजेचे आहे.
हेल्मेट परीधान करणे काळाची गरज आहे.

**संतोष दत्तू शिंदे**
संपर्क ७७२१०४५८४५

# बांधकाम कामगारांचे मध्यान्ह भोजन निकृष्ट दर्जाचे

## भोकर तालुक्यातील प्रकार; कंत्राटदाराचे चांगभले

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** महाराष्ट्र शासन कामगार विभाग महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्यावतीने कामगारांसाठी मध्यान भोजन योजना राबविली जाते, तालुक्यातील कामगारांना भोजन देण्यात येत असल्याची नोंद असली तरी भोजन निकृष्ट दर्जाचे पुरविण्यात येत आहे.संबधीत वरिष्ठांनी चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरते आहे.

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने नोंदणी कृत बांधकाम कामगारांसाठी विविध योजना राबविल्या जातात बांधकाम कामगारांनी व इतर कामगारांनी आपली नोंदणी कामगार विभागाकडे करून घेतल्यानंतर त्यांना ग्रह उपयोगी वस्तू, कामासाठी लागणारे अवजारे, काम करताना दुखापत झाल्यास विमा, अशा विविध योजना असून दर दिवशी त्यांना मध्यान भोजन सुद्धा पुरविल्या जाते कामगारांना काम करत असले त्या ठिकाणीच भोजन मिळावे असा या योजनेचा हेतू आहे.

**पूरवठा करणाऱ्या यंत्रणेची मनमानी :** सदर योजनेमध्ये प्रति कामगार यांना ४ पोळ्या, वरण, भाजी, लोणचे, गुळ असे



तयार केलेले अन्न पुरविल्या जाते सकाळी व सायंकाळी दोन वेळा अन्न पुरविणे असा नियम आहे, नांदेड येथे एकाच ठिकाणी जिल्हाभर पूरवीण्यात येणारे अन्न बनविले जाते व त्या नंतर तालुक्याच्या ठिकाणी एका गाडीमध्ये पूर्वा केला जातो, पोळ्या खराब झालेल्या असतात, भाजी व वरण सुद्धा चवदार नाही कुठे लोणच्याची पाकीट दिले जात नाही तर कुठे गुळ दिल्या जात नाही, काही ठिकाणी अर्धाच डब्बा दिल्या जातो तर काही ठिकाणी अधिक डबे देऊन गाडी निघून जाते शासनाचा खरा हेतू बांधकाम कामगारांना चांगल्या प्रकारचे अन्न मिळणे हा असून सदर कंत्राट घेऊन काम करणारी एजन्सी मात्र केवळ आपल्याच लाभासाठी काम करीत असल्याचे दिसत असून कामगारांना मात्र म्हणावा तसा लाभ होत नाही .

**नांदेड शहरात कीचन व्यवस्था :** नांदेड जिल्ह्यामध्ये "ए एस एम" या कंपनीमार्फत नांदेड जवळ एका ठिकाणी सेंट्रल किचन बनवण्यात आले असून मशीन द्वारे चपात्या लाटल्या जातात, तालुकास्तरावर येणारे अन्न मात्र योग्य राहत नाही त्याचा दर्जा ढासळलेला आहे . मध्यान भोजन पुरविणाऱ्या एजन्सीला मात्र सदर योजनेचा लाभ अधिक होतो आहे, शासनाच्या नियमानुसार दर्जेदार अन्न बनविल्या जाते का, किती बांधकाम कामगारांना अन्न पुरविल्या जाते, योग्य प्रमाणात भोजन दिल्या जाते का, बांधकाम कामगारांच्या स्वाक्षऱ्या आहेत की त्यांच्या स्वाक्षऱ्या स्वत :च कोणी कर्मचारी मारतात, कशाप्रकारे भोजन पुरविल्या जाते ह्या सर्व बाबींची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी केल्यास पुरवठा दारा कडून अनियमितता होत असल्याचे स्पष्ट होणार आहे, हाडोळी ता ( भोकर )येथे शनिवार व रविवार दोन दिवस मध्यान भोजनाची गाडी आली नसल्याची माहिती कामगारांनी दिली आहे, भोजन पुरवठा करणाऱ्या एजन्सीची योग्य प्रकारे चौकशी करून शासनाच्या वतीने बांधकाम कामगारांना मिळणारा योग्य लाभ मिळावा अशी मागणी होत आहे .

# पूर्णेत संत गाडगेबाबाच अस्वच्छतेच्या गराड्यात; संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियान कागदोपत्रीच!

## नगर परिषद प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे 'स्वच्छ शहर सुंदर शहराचे' स्वप्त भंगले

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** महाराष्ट्र शासनाने कोट्यावधी रुपयांचा शासकीय निधी राज्यातील ग्रामपंचायत/नगर पंचायत/नगर पालिका/महानगर पालिकांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देऊन गाव खेड्यापासून ते शहरांपर्यंत स्वच्छतेचे दुत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या नावाने संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियानाची सुरुवात केली परंतु अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियानाची संपूर्णपणे वाट लागल्याचा प्रकार पुर्णा शहरात पाहावयास मिळत



असून शहरातील विविध वसाहतींमध्ये स्वच्छते अभावी अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरल्याचे निदर्शनास येत आहे. याही पेक्षा गंभीर बाबा म्हणजे नगर परिषद इमारतीच्या आसपासचा परिसरात देखील स्वच्छते अभावी अस्वच्छता पसरल्याचे निदर्शनास येत असून नगर परिषद इमारतीच्या दक्षिणेस कंम्पाऊंड वॉलवर संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियानाची जाहीरात रंगवण्यात आली असून यावर स्वच्छतेचे दुत संत गाडगेबाबा यांचा फोटो देखील रंगवण्यात आला असून या जाहीरात केलेल्या कंम्पाऊंड वॉलच्या आसपास अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरले असून या ठिकाणी लोक लघुशंका देखील करत असल्यामुळे पुर्णा नगर परिषद प्रशासनाने तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून शहरासह नगर परिषदेच्या आसपासचा परिसर देखील तात्काळ स्वच्छ करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रताप कदम यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी आघाडीच्या वतीने विद्यार्थी आघाडी शहराध्यक्ष हर्षद कापूरे यांच्या वतीने प्रभारी मुख्याधिकारी कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# ओळखीचा गैरफायदा, पोलिस उपायुक्तांच्या परवानगीनंतर महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

## माजी सैनिकाच्या पत्नीसह दुसऱ्या महिलेचे दागिने गोड बोलून लांबवले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ओळखीचा गैरफायदा घेत माजी सैनिक व अन्य एका महिलेचे ४ लाख ६१ हजारांचे सोन्याचे दागिने एका ओळखीच्या महिलेने गोड बोलून लांबवले. या प्रकरणी २५ डिसेंबरपासून फिर्यादी पोलीस ठाण्यात चकरा मारत होते. दरम्यान वरील घटनाक्रमाची खातरजमा झाल्यावर पोलिस उपायुक्तांच्या आदेशाने महिलेविरुध्द हर्सूल पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

रत्ना दादाराव खंडागळे (४५) रा. चेतनानगर, हर्सूल, असे गुन्हा दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. लक्ष्मी सोटम (६५) रा. चेतनानगर, हर्सूल असे फिर्यादीचे नाव आहे. रत्ना खंडागळे हिने ओळखीचा गैर फायदा घेत दिवाळीच्या आदल्या दिवशी सोटम यांच्या घरी येत गोड बोलून २लाख ५६ हजारांचे दागिने लंपास केले. त्यानंतर सोटम यांच्या घरी मुलीचा साखरपुडा होता. त्या दिवशी लक्ष्मी यांनी अंगावर कोणतेही दागिने घातले नाही म्हणून मुलीला संशय आला व आईला तिने बोलते करताच खरा प्रकार उघडकीस आला. असाच प्रकार चेतनानगरातील लीला वाघुले यांच्या सोबत घडल्याचे पोलीस तपासात उघड झाले. वाघुळेंचेही रत्नाने १ लाख ८० हजारांचे दागिने लंपास केले आहेत. या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक अमोल देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

# पेनूर ते भोसे रस्त्याचे नूतनीकरण झालेच पाहिजे

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पेनुर ते भोसे रस्त्याची फक्त दुरुस्ती नको तर नूतनीकरण करण्यात यावे. या मागणीसाठी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन संघटनेच्या वतीने पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील बस स्थानक चौकामध्ये रास्तारोको करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

हे रस्ता रोको आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उत्तम पोवार, राज्याध्यक्ष सचिन खैरमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तर जिल्हाध्यक्ष किरण शिंदे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष गणेश भोसले, महिला जिल्हाध्यक्ष संगीता भोसले, पंढरपूर तालुका अध्यक्ष विनायक निंबाळकर, मोहोळ तालुका अध्यक्ष दत्तात्रय सुरवसे, जिल्हा कार्याध्यक्ष मारुती क्षीरसागर , जिल्हा उपाध्यक्ष मारुती लोंढे, मोहोळ तालुका उपाध्यक्ष गणेश सरवळे, बिभीषण धुमाळ, महादेव भोसले, रावसाहेब कदम, बाळासाहेब पवार, राहुल गाडे, गणेश वसेकर यांच्या



उपस्थितीत हे आंदोलन पार पडले.

पेनुर ते भोसे हा रस्ता पंढरपूर व मोहोळ तालुक्याला जोडणारा दुवा असून या रस्त्यावर मोहोळ तालुक्यातील पेनुर, येवती तर पंढरपूर तालुक्यातील रोपळे, मेंढापूर पांढरेवाडी भोसे यासह खरातवाडी बाभुळगाव आदी गावातील नागरिकांची ये जा असते. परंतु या रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून यामुळे अनेक लहान मोठे अपघात घडत आहेत. याबाबत वारंवार पाठपुरावा करून या रस्त्याचे नूतनीकरण न करता डागडुजी करण्याची तात्पुरती मलमपट्टी केली जाते. त्यामुळे काही दिवसातच ती केलेली दुरुस्ती उचकटून रस्त्यावर पुन्हा खड्ड्यांची चाळण होत आहे. यामुळे नागरिकांची समस्या सुटत नाही तर दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आलेली रक्कम मात्र वाया जात आहे.

# परमिट बियर बारमध्ये देशी विकाल तर बंद होईल परवाना

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** परमिट बियर बारमध्ये देशी विकाल तर बंद होईल परवाना राज्य उत्पादक शुल्क औरंगाबाद यांचा इशारा आधुनिक केसरी वृत्तपत्रातून राज्य उत्पादक शुल्क फुलंब्री तालुक्यात निर्भान अशा विषयाचे दैनिकातून बातमी प्रकाशित होतात. राज्य उत्पादक शुल्क विभाग औरंगाबाद खडबडीतून जागे होऊन या विभागाने वानेगाव फाटा येथे धडक फोटफाटासह दाखल होऊन हॉटेल रॉयल मराठा येथे कारवाई करत विभागाने श्रीमान पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक ए.एस डहाके एस.डी घुले कन्नड विभाग यांनी कारवाई करत रॉयल मराठा दिनांक 12 जानेवारी रोजी सील केले. या कामे त्यांचे सहकारी वाहन चालक ए.एस अन्नदाते ए.एस खरात बी.सी किरवले तथा पोलीस उपनिरीक्षक एस.जे धुळे महिला कॉन्स्टेबल पी.व्ही भंडारे यांनी मोलाचे मदत केली.

# सामाजिक कार्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना चांगले व्यासपीठ

## ॲड. मोहनराव : राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पूणे :** देशमुख सामाजिक कार्य करताना आपले पद, वय, शिक्षण याचे काहीही बंधन नसते. महाविद्यालयीन जीवनात समाजसेवा करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक चांगले व्यासपीठ आहे, असे मत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व शंकरराव भेलके महाविद्यालय नसरापूर, यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीराचे आयोजन ३ जानेवारी ते ९ जानेवारी या दरम्यान केले होते. या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्ष म्हणून संस्थेचे खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संजीव लाटे ( प्राचार्य अमृतेश्वर महाविद्यालय विंझर), डॉ. नितीन घोरपडे ( प्राचार्य बाबूराव घोलप महाविद्यालय सांगवी) डॉ. तुषार शितोळे ( प्राचार्य शंकरराव भेलके महाविद्यालयात नसरापूर) तसेच रा. से. यो . कार्यक्रम अधिकारी डॉ. जगदीश शेवते सर, सहकारी म्हणून प्रा. जाधवर डी. एस. , प्रा. सीमा कांबळे पत्रकार विशाल शिंदे उपस्थित होते.

त्यांनंतर कार्यक्रम अधिकारी डॉ. जगदीश शेवते यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी महविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले सामाजिक उपक्रम याची माहिती दिली.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना,



"युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असते. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढताना दिसून येत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले..

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. मोहनराव देशमुख म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी युवक तत्पर व रव्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे, असे मत व्यक्त केले. प्रा. जाधवर डी.एस. यांनी या सात दिवसीय हिवाळी विशेष श्रम संस्कार शिबीरामध्ये मुलांनी केलेल्या कामांचा आढावा सांगितला.

# पूर्णेत 'महसुल'ने राबवले बेकायदेशीर खडीक्रशर दगडखाणपट्टा कारवाईनाट्य

## कारवाई मात्र गुलदस्त्यात : महसुल प्रशासनाने सिल केलेल्या अनेक खडीक्रशर दगडखाणपट्यातून उत्खननासह होतेय अवैध खडी निर्मिती; तालुक्यातील महसुल प्रशासनात कार्यरत झारीतील शुक्राचार्यांनी गौण खनिज तस्करांशी जोपासले हितसंबंध ?

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी / पूर्णा :** परभणी जिल्हा प्रशासनासह महसुल विभाग तसेच पोलिस प्रशासनाला देखील न जुमानता स्थानिक तहसिल व महसुल प्रशासनातील भ्रष्ट झारीतील शुक्राचार्यांच्या खंबीर पाठबळामुळे मुजोर झालेली माफियाशाही गौण खनिज अर्थात रेती दगड मुरुम मातीचे बेकायदेशीररित्या प्रचंड प्रमाणात उत्खनन करीत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसुल शासकीय तिजोरीत जमा न होता झारीतील शुक्राचार्यांच्या घशात जात असल्याचे दिसत असून तालुक्यात सर्वकाही सुरळीत चालत असल्याचा भासवण्यासाठी थातूर मातूर कारवाईनाट्य रंगवून जिल्हा प्रशासनासह महसुल प्रशासनाच्या डोळ्यात सोईस्कररित्या धुळफेक करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून तालुक्यात मागील एक ते दिड वर्षापासून शासन दफ्तरी मुद्दत संपल्यासह बंद असल्याची नोंद असलेले खडीक्रशर दगडखानपट्टे मात्र शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी अर्थात महसुल बुडवून प्रत्यक्षात खुलेआम चालत असल्याचे व प्रचंड प्रमाणात उत्खननासह खडीक्रेशरच्या माध्यमातून खडी निर्मितीसह कालबाह्य झालेल्या व कुठल्याही प्रकारचे इन्श्युरंन्स नसलेल्या असंख्य टिप्पर/हायवा/ट्रक आदी वाहनांतून वाहतूक करीत शासकीय गुत्तेदारांना शासकीय विकासकामांसाठी पुरवठा करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार प्रसारमाध्यमांनी जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर स्थानिक तहसिलदार पल्लवी टेमकर व महसुल प्रशासनातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनीदि.१६ डिसेंबर २०२२ रोजीकारवाई नाट्य रंगवून तालुक्यातील शासन दफ्तरी बंदची नोंद असलेल्या ५ खडीक्रेशन दगडखानपट्यांसह अन्य ०९ खडीक्रशर दगडखानपट्टे सिल करण्याचे नाट्य तर सुरळीत रंगवले परंतु यातील अनेक खडीक्रशरधारक अद्यापही बेकायदेशीरपणे आपल्या दगडखानपट्यातून बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात उत्खनन करून खडी निर्मिती करीत असल्याचे दिसत असून स्थानिक प्रशासनाने परवान्यासाठी प्रस्थाव सादर करून त्यांना बेकायदेशीर उत्खननासह परवानाप्राप्त होण्यापुर्वीच शासनाचा लाखो रुपयांचा महसुल बुडवून खडीनिर्मिती करण्यास खुली सुट दिली की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



पुर्णा तालुक्यातील १३ बेकायदेशीर स्टोन क्रेशर खानपट्टा धारकांवर स्थानिक तहसिलदार पल्लवी टेमकर व महसुल प्रशासनाचे नायब तहसिलदार नितेशकुमार बोलेलू यांच्या आदेशाने दि.१६ डिसेंबर २०२२ रोजी संबंधित भागातील मंडळ अधिकारी तलाठी यांनी कारवाई करीत अवैधरित्या चालणाऱ्या स्टोन क्रेशरांना' सिल ठोकण्याचे कारवाई नाट्य सोईस्कररित्या रंगवले खरे मात्र मागील अंदाजे वर्ष दिड वर्षभरापासून संबंधित स्टोन क्रेशर खानपट्टा धारक आपला गैरकारभार खुलेआम चालवत कोट्यावधी रुपयांच्या गौण-खनिजाचे उत्खनन करीत त्याच चोरट्या गौण-खनिजाची शासकीय गुत्तेदारांना लेखी स्वरुपात करार करून विक्री करीत असतांना स्थानिक महसुल प्रशासनाला आपल्या कर्तव्याचा अक्षरशः विसर पडला होता की महसुल प्रशासन जाणीवपूर्वक झोपेचे सोंग घेत होते की काय ? असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच म्हणावे लागेल.

पुर्णा तहसील व महसुल प्रशासनाने दि.१६ डिसेंबर २०२२ रोजी तालुक्यातील १४ खडीक्रशर खानपट्टे सिल करण्याचे सोपस्कार कागदोपत्री पुर्ण करून दि.१९ डिसेंबर २०२२ रोजी जा.क्र.२०२२/गौण खनिज/कावी या अंतर्गत जिल्हा खनिकर्म अधिकारी परभणी यांना लेखी स्वरुपात पत्र पाठवून गौण खनिजांच्या अनाधिकृत उत्खनन व वाहतूक व वापरास प्रतिबंद करणेकामी कारवाई करणे संदर्भात पत्र पाठवून अवैध उत्खननाची मोजमाप करण्यासाठी ड्रोन उपलब्ध करुन देण्याची मागणी केली खरी परंतु या मागणीला जवळपास एक महिन्यांचा कालावधी होत असल्यामुळे कारवाईनाट्य अद्यापही गुलदस्त्यातच असल्याचे एकीकडे निदर्शनास येत असतांना दुसरीकडे मात्र या सिल केलेल्या खडीक्रशर दगडखानपट्यापैकी अनेक खडीक्रशर दगडखानपट्टाधारक आपला कारभार सुरळीतपणे चालवत अधैध उत्खनन व खडीनिर्मितीसह शासनाचा महसुल बुडवून वाहतूक व विक्री करीत असल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येत आहे.



# पूर्णेत फोटोची भाववाढ; फोटोग्राफर्स असोसिएशनची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** नुकत्याच झालेल्या फोटोग्राफर बांधवांच्या एका मेळाव्यात फोटोग्राफी साठी लागणाऱ्या कच्च्या साहित्याचे भाव प्रचंड वाढल्यामुळे नाईजास्तव फोटो च्या भावात नाममात्र वाढ करत असल्याचे अध्यक्ष नरेश यादव यांनी स्पष्ट केले आहे. ज्येष्ठ फोटोग्राफर आर्यन अण्णा यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर मेळावा उत्साहात संपन्न झाला त्यात सदर भाववाढ करण्यात आली आहे.

यावेळी पूर्णा तालुक्यातील सर्व फोटोग्राफर बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते, यामधे अर्जेंट पासपोर्ट साइज् फोटो 6 नग=रू.60, स्टुडिओ 4X6 SOFTCOPY=100 रुपये, तसेच दोन दिवसांनी पासपोर्ट फोटो 12 नग=60रुपये जाहीर करण्यात आली,तसेच सर्व ग्राहकांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे असे आवाहन सर्व पूर्णा तालुका फोटोग्राफर असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.

# प्रतापगडावर दुमदुमली लासूरच्या युवकाची छत्रपती शिवरायांची गारद

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील एका युवकाची छत्रपती शिवाजी महाराज यांची गारद जिल्हाभरातील सोशिअल मीडियावर तुफान व्हायरल होत असून अनेक शिवप्रेमीच्या व्हाट्सअप स्टेटसवरही ही शिवगारद पाहायला मिळत आहे.

लासूर स्टेशन येथील भूषण शर्मा हा युवक सोमवारी 16 जानेवारीला मित्रांसोबत किल्ले प्रतापगडावर गेला होता. यावेळी हडपसर येथील एका शाळेची सहल प्रतापगडावर आलेली होती यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांपैकी कोणाला छत्रपती शिवाजी महाराज यांची गारद येत असेल तर शिवगर्जनाचा जयघोष करा असे सांगितले मात्र उपस्थित कुठल्याही विद्यार्थ्याला गारद



येत नव्हती मात्र लासूर स्टेशन येथील शिवप्रेमी युवक भूषण शर्मा याने ही गारद प्रतापगडावरील भव्य असलेल्या भगव्या ध्वजासमोर पुकारून उपस्थित विद्यार्थी शिक्षक व राज्यभरातील शिवप्रेमी यांच्यात पुन्हा एकदा शिवचैतन्य भरले यावेळी विद्यार्थी व शिवप्रेमीत उत्साह संचारला होता.

# कब्रस्तानसाठी ५० लक्ष निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील पुरातन असलेल्या चाळीसगाव रोड येथील कबरस्थानमध्ये अनेक समस्या होत्या. कब्रस्थान अंतर्गत कॉंक्रीट रस्ते नव्हते त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांना दफनविधीसाठी फार त्रास सहन करावा लागत होता. तसेच कब्रस्थानचे क्षेत्र मोठे असल्याने पोल व पथदिव्याची सुविधा नसल्याने रात्री अंधाराचे साम्राज्य असायचे तसेच कब्रस्थानच्या नाल्याकाठील भागात संरक्षक भिंत नसल्याने जनावरांचा धोका होता. यासंदर्भात समस्त मोमीन पंच कबरस्थानच्या पंच कमिटीने आमदार फारुख शाह यांच्याकडे या कामासाठी निधीची मागणी केलेली होती. त्याची आमदार फारुख शाह यांनी तत्काळ दखल घेत मुख्यमंत्री तथा अल्पसंख्यांक मंत्री ना.एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे ५० लक्ष रुपयाचा निधीची मागणी केली होती. त्याला प्रतिसाद देत एकनाथ शिंदे साहेबांनी मोमीन कबरस्थानच्या कामासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजुर केला आहे. त्यासंदर्भात शासन



निर्णय झाला असून लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.धुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील कब्रस्थानच्या कामासाठी आमदार फारुख शाह यांनी करोडो रुपयाचा निधी आजपर्यंत मंजुर करून आणलेला असून त्याबाबत समस्त मुस्लीम समाजामध्ये एक समाधानाचे वातावरण असून याबाबत माजी उपमहापौर सव्वाल हाजी समस्त मोमीन पंच कब्रस्थान यांच्यावतीने आमदार फारुख शाह यांचा सत्कार करण्यात आला यावेळेस हाजी सव्वाल यांनी सांगितले आजपर्यंत धुळे शहरात जितके आमदार झाले त्यापैकी आमदार फारुख शाह यांनी धुळे शहराच्या विकासासाठी सगळ्यात जास्त निधी आणला असून त्यांची बरोबरी कोणीच करू शकणार नाही. या सत्काराच्या कार्यक्रमाच्या वेळी माजी.नगरसेवक शकील इसा,मुश्ताक अन्सारी,मौलवी शकील व समस्त मोमीन पंच कबरस्थान कमिटीचे सदस्य उपस्थित होते.



# शासकीय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी

## खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी : दिशा समिती सभेच्या अध्यक्षस्थानावरून सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**नवनाथ खिलारे**

**सोलापूर :** सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना खासदार डॉक्टर जय सिद्धेश्वर महास्वामी यांनी दिल्या.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती सभा (दिशा) च्या बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. नियोजन भवन येथे आयोजित या बैठकीस खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार बबनदादा शिंदे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे यांच्यासह संबंधित विभागाचे प्रमुख तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार समाधान आवताडे उपस्थित होते.

यावेळी खासदार डॉ. महास्वामी म्हणाले, विकास कामांचे नियोजन करताना सामूहिक तसेच वैयक्तिक योजनेच्या लाभांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तातडीने पात्र लाभार्थींना घरकुल अनुदान द्यावे. जिल्हयांतर्गत रस्ते तसेच महामार्गाच्या कामांमध्ये गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्यात याव्यात. जिल्ह्यात शेतकरी, ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देत सर्व मूलभूत सोयीसुविधा गुणवत्तापूर्ण उपलब्ध करुन द्याव्यात. सिंचन विषयक सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सोलापूर शहरात सुरू असलेली कामे तसेच शहरातील नागरिकांना सम प्रमाणात व मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी तात्काळ पाणीपुरवठा योजना मार्गी लावाव्यात, अशा सूचनाही यावेळी खासदार डॉ.महास्वामी यांनी दिल्या. शेतीसाठी अखंडित वीज पुरवठा होण्यासाठी विद्युत उपकेंद्रासाठी नव्याने प्रस्ताव सादर करावेत. प्रधानमंत्री तसेच मुख्यमंत्री



सडक योजनेची जिल्हयातील रस्त्यांची कामे चांगल्या दर्जाची होण्यासाठी गुणवत्तापूर्ण काम न करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करावी. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलांना जागा उपलब्ध नसल्यामुळे जिल्ह्यातील काही प्रमाणात घरकुले रखडली असून लाभार्थींना जागा उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. सांसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना राबवाव्यात. तसेच सर्व शासकीय योजनांची माहिती जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयाच्या फलकावर लावावी, जेणेकरून कोणताही पात्र नागरिक शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाही. निराधार योजनेतील अनुदान तात्काळ लाभार्थ्यांना वाटप करावे, अशा सूचना खासदार ओम राजे निंबाळकर यांनी यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनीसर्व योजनांतर्गत राबवण्यात येत असलेल्या विकास कामांबाबत माहिती देऊन प्रलंबित कामे संबंधित विभागाकडून कालमर्यादेत पूर्ण करुन घेतली जातील. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड आवश्यक केले आहे. ज्येष्ठ नागरिक तसेच इतरांना आधार कार्ड संबंधित काही अडचणी येतात यासाठी जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून आधार कार्ड काढून देण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. शासकीय योजनांचा लाभ गावातील प्रत्येक पात्र, गरजू नागरिकाला मिळावा यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात कृतीसंगम मेळावे घेऊन शासनाच्या अनेक योजनांचा लाभ एकाच छताखाली देण्यात आला असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी दिली.



# सुलतानपूर शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला निसर्ग सहलीचा आंनद

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** ता.खुलताबाद शालेय जीवनातील आनंद देणारी बाब म्हणजे निसर्ग सहल. सहलीला जाण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी आसूसलेला असतो. सहल किती दिवसांची, कोठे जातेय यापेक्षा आपल्या सवंगड्यासह मौजमजा करायला मिळणारा हा आनंद काही औरच असतो. केंद्रीय प्राथमिक शाळा सुलतानपूर येथील विद्यार्थ्यांची निसर्ग सहल व क्षेत्रभेट घृष्णेश्वर सहकारी साखर कारखाना येथे गेली होती.विद्यार्थ्यांना निसर्ग सहलीतून मिळणाऱ्या आनंदाला द्विगुणीत करत धम्माल केली. वर्गाच्या चार भिंतीच्या बाहेर असणाऱ्या विविध बाबीचे ज्ञान मिळावे व अभ्यासातून सुटका मिळावी व मनोरंजनही व्हावे या हेतूने सहलीचे आयोजन करण्यात होते.

या सहलीतून विद्यार्थ्यांना व्यवसाययाचे ज्ञान देण्यात आले. साखर तयार होण्याची प्रक्रिया समजली. सहलीसाठी सुलतानपूर येथील प्रसिद्ध व्यवसायिक सतीश शुक्ला यांनी वाहनांची व्यवस्था करून दिल्याने सर्व विद्यार्थ्यांना आंनद मिळाला. सहल यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रामेश्वर वायाळ, मो.अनिस यांच्यासह संजय बुचुडे, मार्तंड चौधरी, हुमायून शेख,पद्मा आधाने, वैशाली कंकाळ, सविता राऊत,रेखा खरात, छाया सोनवणे, परवीन बानो, नागमणी पेद्दी यांनी परिश्रम घेतले.

# कनकशीळ येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** थोडेसे मायबाप क्रमातून विविध कार्यक्रम आरोग्यवर्धीनी केंद्र कनकशीळ येथे विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्यामध्ये असंसर्गजन्य व्याधी निदान आणि थोडेसे माय बापासाठी पण या उपक्रमांतर्गत नागरिकांची मधुमेह, हृदयरोग,अस्थमा, मोतीबिंदू, क्षयरोग, कुष्ठरोग आणि कर्करोग या आजारांसाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके यांनी तपासणी केली. शिबिरात एकुण 70 नागरिकांनी सहभाग नोंदवला.

मधुमेह आणि हृदयरोग असलेल्या रुग्णांना औषधी वाटप करण्यात आले, कर्करोग आणि कुष्ठरोग संशयीत रुग्णांना प्रा. आ. केंद्र येथे संदर्भित करण्यात आले,2 दिव्यांग रुग्णांना जिल्हा रुग्णालय औरंगाबाद येथे जाण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. 5 मोतीबिंदु संशयित असलेल्या रुग्णांना नेत्ररोग रुग्णालय हमखास मैदान येथे संदर्भित करण्यात आले. 3 क्षयरोग संशयीत रुग्णांना ग्रामीण रुग्णालया खुलताबाद येथे संदर्भित करण्यात आले, तसेच अन्य सामान्य आजार असलेल्या रुग्णांना औषधी वाटप करण्यात आले. नागरिकांना आहार आणि योगा या विषयी मार्गदर्शन केले. 13 रुग्णांचे इ-संजीवनी टेली कॉलिंगद्वारे जि.रु. औबाद येथील हब सोबत संपर्क साधुन उपचार करण्यात आले, आशाना आभा कार्ड काढण्यासाठी मार्गदर्शन केले. एकूण 23 आभा कार्ड काढण्यात आले. या शिबिरासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके, आरोग्य सहायक श्री जाधव आरोग्य सेवक अनिल बनकर आरोग्य सेविका ज्योती चिमणे आशा हिरा दांडगे मदतीनीस राणे आदींनी परिश्रम घेतले.




# लासूर स्टेशन प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांच्या ऑपरेशनसाठी घेतले दोन हजार

## ऑपरेशन झालेल्या महिलांची गैरसोय ऑपरेशननंतर तब्बल 79 महिलांना जमिनीवर झोपवले

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून लासूर स्टेशन, सिद्धनाथ वाडगाव व भेडाळा अश्या तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणाऱ्या गावातील तब्ब्ल 79 ऑपेरेशन झालेल्या महिलांना अक्षरशः जमिनीवर झोपवले.

एवढेच कमी कीं काय प्रत्येक ऑपरेशन झालेल्या महिलांकडून दोन हजार रुपये आकारले बदल्यात महिलांना कुठल्याही प्रकारच्या सोयीसुविधा नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांनी पत्रकारांशी संपर्क साधला तात्काळ पत्रकार बंधूनी प्राथमिक आरोग्य गाठले तर ऑपरेशन झालेल्या महिलांची परिस्थिती विदारक होती त्यामुळे आत्तातरी लोकप्रतिनिधी जागे होतील का असा प्रश्न रुग्णांच्या नातेवाईकाकडून होत आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)


डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अडबंगीनाथ जन्म-तपोभूमी धामोरीत धर्मबीज कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**कोपरगाव :** नवनाथांपैकी एक अडबंगीनाथ जन्मभूमी व तपोभूमी असलेल्या धामोरी, ता. कोपरगाव येथे धर्मबीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. धामोरी येथील अडबंगीनाथ तपोभुमी ही नवनाथ संप्रदायाचे आदिपीठ असुन अडबंगीनाथाचे जन्मस्थान व तपोभूमी आहे. नवनाथ ग्रंथामध्ये ३४ व्या अध्यायात ओवी क्र.६२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री गोरक्षनाथांनी अडबंगीनाथांना दीक्षा देऊन आपल्या पदस्पर्शाने हे स्थान पुनीत केले आहे. नवनाथ ग्रंथसार किंवा नवनाथ कथाचरित्रात धामोरीचा उल्लेख धामापूर असा आहे. नवनाथ ग्रंथातील ३३ व ३४ व्या अध्यायांमध्ये या स्थानाचे महत्व सांगितले आहे. येथे सदगुरु चैतन्य अडबंगनाथांची तपोभूमी असून येथे ७५० वर्षांपूर्वीचा गोरक्ष चिंच वृक्ष आहे. या महाकाय वृक्षास नऊ विराट फांद्या आहेत. त्याला नवनाथ असे म्हणतात. या गोरक्षचिंचेची पाने, फळे, साल याचा बहुविध रोगांवर रोगनाशक म्हणून उपयोग होतो. या चिंचेच्या खोडात पूर्वेकडून पश्चिमेस निघण्याचा भुयारी मार्ग आहे. या स्थानाचे महत्व असे की, गोरक्षनाथ महाराज तिर्थाटन करत असताना धामोरी (धामापूर) या गावी आले. माधुकरी मागण्यासाठी गेले असता त्यांना माणिक (अडबंगनाथ) नावाचा शेतकरी शेतात औत हाकताना दिसला. गोरक्षनाथांनी त्याच्या जवळ माधुकरी मागितली असता त्याने आपल्या जवळ असलेली शिदोरी दिली व मातीच्या घड्यात पिण्यासाठी पाणी दिले. गोरक्षनाथ भोजन करुन तृप्त झाले व वर मागण्यास सांगितले. त्यावर माणिक म्हणाले, 'तू काय वर देणार? तुला मीच माधुकरी दिलीय. तुझं काम झालंय ना, जा आता तू..' माणिक अडबंग असल्याने गोरक्षनाथ माणिकला म्हणाले की, 'तुला काही मागायचे नसेल तर मला वर दे की, ईच्छेला जे येईल ते त्याने करु नये' माणिकला त्यात काही अवघड वाटले नाही. म्हणून माणिकने गोरक्षनाथांना मागितलेला वर दिला. सूर्य अस्ताला जाण्याची वेळ झाली गोरक्षनाथ तेथून निघून आपल्या मार्गाला लागले. संध्याकाळ होताच माणिकने औत सोडले व ते डोक्यावर घेऊन ते घरी न्यावे, अशी त्याची ईच्छा होती. पण त्याने गोरक्षनाथांना वर दिल्याचे आठवले व तो तसाच घरी न जाता डोक्यावर औत घेऊन ऊभा राहिला. असाच एक तप लोटला. गोरक्षनाथ आपले गुरु मच्छिंद्रनाथ व चौरंगीनाथांसह तेथे आले. गोरक्षनाथांनी मच्छिंद्रनाथांना माणिकबद्दल कल्पना दिली. माणिक १२ वर्ष तटस्थ उभा होता. माणिकच्या शरीरात त्राण उरले नव्हते. मच्छिंद्रनाथ व चौरंगीनाथ येथील गोरक्ष चिंचेच्या खाली बसले. गोरक्षनाथ माणिकला म्हणाले, 'खरोखर तु महान तपस्वी आहेस तुझ्या सारख्याचा अनुग्रह घ्यावासा वाटतो' त्यावर माणिक म्हणाले, 'मला गुरु करण्यापेक्षा बेट्या तुच का नाही होत माझा गुरु'. असे म्हणताच गोरक्षनाथांना माणिकचे कान फुकले. त्यांच्या मंत्राने माणिक सज्ञान झाला व त्यांना त्रैलोक्य हे समदृष्टीने दिसू लागले. त्यांना सर्व ज्ञान प्राप्त होऊन ते बृहस्पती समान विद्वान झाले. गोरक्षनाथांनी त्यांचा हात धरुण चिंचेखाली आणले व मच्छिंद्रनाथांना सांगितले हा अडबंग आहे म्हणून त्यास 'अडबंगनाथ' असे ओळखले जावे. गोरक्षनाथांनी अडबंगनाथांना नाथसंप्रदयाची दिक्षा देऊन निर्धारित यात्रेस घेऊन गेले. तिर्थयात्रा करताना अडबंगनाथांनी सर्व विद्या संपन्न केल्या. येथे अडबंगीनाथांनी बारा वर्षे तप केले आहे. या जागेवर नवनाथांचे भव्य मंदीर व नऊ विराट फांद्यांचा वृक्ष हा 'गोरक्षचिंच' म्हणुन प्रख्यात आहे. जगाच्या पाठीवर असा वृक्ष कुठेही आढळत नाही. या वृक्षास येणारे फळ हे नारळासारख्या आकाराचे असते. आयुर्वेद शास्त्राधारे सदरच्या गोरक्षचिंचेची पाने, फळे व साल हे बहुरोग नाशक म्हणुन प्रसिध्द असुन भाविकांना त्याचा लाभ मिळतो. हा प्राचीन वृक्ष बघण्यासाठी येथे भक्तांची मांदियाळी असते. गरोदर स्त्रीला प्रसूतीवेदना असह्य होत असल्यास गोरक्षचिंच किंवा पाला उगाळून देतात. घरात सुख शांती मिळते म्हणून बहुतेक घरांमध्ये आढ्याला गोरक्षचिंचेचे फळ टांगलेले आढळते. येथे माघ शुद्ध द्वितीयेला 'धर्मनाथ बीजोत्सव' असतो. या उत्सवाची सुरुवात नवनाथ ग्रंथाचे सामुदायिक पारायण करून होते. धर्मनाथ बीजेच्या दिवशी आमटी - भाकर अशा महाप्रसादाने सांगता होते. या कालावधीत अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, पुणे, मुंबई, धुळे, जळगाव या भागातून हजारो नाथभक्त दर्शनासाठी गर्दी करतात.



यावर्षी शनिवार दि.२१ जानेवारी २०२३ रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत वकील राजेंद्र बदामे यांच्या शुभहस्ते शनिदेव अभिषेक, सांय. ५ ते ६ ह. भ. प. मधुकर महाराज गडाख यांचे प्रवचन होईल. सोमवार दि.२३ जाने.रोजी सकाळी ७.३० वा.श्री नवनाथ ग्रंथपूजन प.पु. गुरुवर्य संतश्री रमेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते होईल. सकाळी ८ ते ९ वेळेत भिक्षा फेरी, श्री नवनाथ पालखी मिरवणूक, कलश पुजन व सकाळी १० वा. ह. भ. प. शिवाजी महाराज भालुरकर यांचे कीर्तन, सकाळी ११.४३ वा. प. पु. गुरुवर्य संतश्री रमेशगिरीजी महाराज हे अमृतसंदेश देणार आहेत.

# अविवाहित असल्याचे सांगून युवतीशी विवाह

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जीममध्ये कसरतीसाठी आलेल्या तरुणीला जीम ट्रेनर युवकाने अविवाहित असल्याचे सांगून प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्याशी प्रेमविवाह केला. महिन्याभरातच घरी त्याची पत्नी आणि मुलगा आल्याने युवकाचे बिंग फुटले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणीने जाब विचारताच युवकाने तिच्याशी शारीरिक संबंधाचे मोबाईलने काढलेले फोटो आणि व्हिडिओ प्रसार माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी दिली. हुडकेश्वरमध्ये राहणारी २८ वर्षीय तरुणी जीममध्ये जात होती.




# सामाजिक कार्यकर्ते सागर ढिवरे यांचा लोक जनशक्ती पार्टी पक्षामध्ये जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील सामाजिक कार्यकर्ते सागर ढिवरे यांनी दिवंगत रामविलास पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. त्यांची धुळे जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर ही नियुक्ती पत्रकार परिषदेतून घोषित करण्यात आली आहे.

पूर्व केंद्रीय मंत्री पद्मभुषण दिवंगत रामविलास पासवान यांच्या विचारांना प्रेरीत होवून व लोक जनशक्ती पार्टी युवा लोकसभा खासदार चिराग पासवान यांच्या मार्गदर्शनाखाली लोक जनशक्ती पार्टी मध्ये त्यांनी आपल्या असंख्य कार्यकत्यास जाहीर प्रवेश केलेला आहे . लोक जनशक्ती पार्टीचे प्रदेश अध्यक्ष शमीमभाई हवा, महाराष्ट्र कार्याध्यक्ष विनय गायकवाड, महाराष्ट्र प्रदेश संघटक किशोर कांबळे व उत्तर महाराष्ट्र प्रभारी व धुळे जिल्हा अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे, महिला आघाडीच्या नेत्या शोभाताई चव्हाण, जिल्हा महासचिव कुंदन खरात, उत्तर महाराष्ट्र संघटक राज साळवे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर चव्हाण यांच्या नेतृत्वात सागर धिवरे यांची निवड करण्यात आली आहे. सदर ही निवड आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून करण्यात आली.

# सकल हिंदू समाज'च्या वतीने रविवारी हिंदू जनआक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सकल हिंदू समाजच्या वतीने येत्या रविवारी हिंदू जनआक्रोशमोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राजे शिवराय प्रतिष्ठानचे महेश पवळे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे धीरज घाटे, श्री. शंभू चरित्राचे अभ्यासक नीलेश भिसे, मातृशक्तीच्या नलिनी वायाळ, विश्व हिंदू परिषदेचे किशोर चव्हाण, पतित पावन संघटनेचे स्वप्नील नाईक, शिव समर्थ प्रतिष्ठानचे दीपक नागपुरे, शिव प्रतिष्ठानचे संजय पासलकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पवळे म्हणाले, 'या मोर्चाची गेल्या एक महिन्यापासून तयारी सुरू आहे. हा मोर्चा अभूतपूर्व असा होईल. शहरातील राजकीय पक्ष, हिंदुत्ववादी संघटना, व्यापारी, गणेशोत्सव मंडळे या मोर्चात सहभागी होणार आहेत. मोर्चात महिला आणि युवकांचा लक्षणीय सहभाग असेल. सकल हिंदू समाजाच्या ताकदीचे या निमित्ताने दर्शन होणार आहे. तेलंगाणाचे आमदार राजा भैया, तुकाराम महाराजांचे वंशज शिवाजीराव मोरे, शिरीष मोरे, धनंजय देसाई यांचा विशेष सहभाग असणार आहे.'

भिसे म्हणाले, 'धर्मांतर, गोहत्या आणि लव जिहाद यासाठी कडक कायदे करावेत व त्यांची कठोर अंमलबजावणी करावी आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिवस धर्मवीर दिन म्हणून साजरा करावा या मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.' घाटे म्हणाले, 'रविवारी (२२ जानेवारी) सकाळी दहा वाजता लाल महाल येथून मोर्चाची सुरूवात होईल. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची महाआरती करून लक्ष्मी रस्त्याने मोर्चा डेक्कन परिसरातील धर्मवीर संभाजी महाराजांच्या स्मारकाजवळ पोहोचेल.'

# पंढरपूर तालुक्यातील 1 लाख 52 हजार 727 नागरिकांना मिळणार मोफत धान्य

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून पात्र



रेशन कार्डधारकांना वर्षभर मोफत धान्य उपलब्ध होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत तालुक्यातील 1 लाख 52 हजार 727 नागरिकांना जानेवारीपासून मोफत धान्य वितरण केले जात आहे. यासाठी महिन्याला तालुक्यात सुमारे 353 टन गहू व 516 टन तांदूळ असे एकत्रित 869 टन धान्य वाटप करावे लागणार असल्याची माहिती तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यात ग्रामीणमध्ये 116 तर शहरात 30 असे एकूण 146 रेशन दुकान आहेत. अंत्योदय योजनेत 5 हजार 713 कार्डधारक असून 21 हजार 506 लोकसंख्या आहे. तर अन्नसुरक्षा योजनेत 32 हजार 701 कार्डधारक असून 1 लाख 31 हजार 221 लोकसंख्या आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत अंत्योदय कार्डधारकास प्रतीकार्ड 15 किलो गहू 2 रुपये किलो दराने व 20 किलो तांदूळ 3 रुपये किलो दराने अंत्योदय कार्डधारकास दिले जात होते. तसेच अन्नसुरक्षा योजनेत प्रतिव्यक्ती 2 किलो गहू 2 रुपये दराने व 3 किलो तांदूळ 3 रुपये किलो दराने दिले जात होते. जानेवारी 2023 पासून अंत्योद्य योजनेतील प्रत्येक कार्डधारकाला 15 किलो गहू 20 किलो तांदूळ मोफत दिले जाणार आहे. तर अन्नसुरक्षा योजनेत प्रतिव्यक्ती 2 किलो गहू व 3 किलो तांदूळ मोफत दिले जाणार आहे.

तालुक्यातील सर्व रेशन दुकानदारांकडून या योजनेतील नागरिकांना योग्य पध्दतीने वाटप केले जाणार आहे. या योजनेतील कार्डधारकांनी पैसे देऊ नयेत तसेच कोणी पैशाची मागणी केल्यास तात्काळ अन्नधान्य पुरवठा विभागाशी संपर्क साधावा असे, आवाहनही तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी केले आहे.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद